




# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526





https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२०१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.५ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## माफी तोच मागतो, जो चुकीचे काम करतो, राहुल गांधींचे मोदींवर टीकास्त्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५सांगली**

मालवणमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडला. या दुर्घटनेवरून विरोधी पक्षनेते राहुल गांधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. जो चुकीचे काम करतो, तोच माफी मागतो, असे म्हणत राहुल गांधींनी पंतप्रधान मोदींना लक्ष्य केले. स्व. पतंगराव कदम यांच्या पुर्णाकृती पुतळा अनावरण कार्यक्रमात ते बोलत होते.



राहुल गांधी म्हणाले, आज आपण कदमजींच्या पुतळ्याचे अनावरण केले. तिथे असताना मी विचार करत होतो की, कदमजींनी ६० वर्षे आपल्यासोबत काम केले. त्यांनी प्रामाणिकपणे काम केले. त्यांनी ६० वर्षात कधीही माफी मागितली नाही. का मागितली नाही, कारण गरज पडली नाही. हेच सत्य आहे. माफी तोच मागतो, जो चुकीचे काम करतो, असे म्हणत राहुल गांधींनी पंतप्रधान मोदींना लक्ष्य केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, काही दिवसांपूर्वी इथे शिवाजी महाराजांचा पुतळा बनवला. मी वृत्तपत्रात वाचले की, पंतप्रधान म्हणाले, मी शिवाजी महाराजांची माफी मागतो. मला हे समजून घ्यायचे आहे की, पंतप्रधानांनी कोणत्या कारणासाठी माफी मागितली ?अनेक कारणे असू शकतात. पहिले कारण असू शकते की, हा जो पुतळा होता, त्याचे कंत्राट आरएसएसच्या व्यक्तीला दिले होते. कदाचित पंतप्रधानांना म्हणायचे आहे की, मी हे कंत्राट आरएसएसच्या व्यक्तीला द्यायला नको होते. मी हे कंत्राट गुणवत्तेच्या आधारावर द्यायला पाहिजे होते, असे म्हणत राहुल गांधी मोदींना लक्ष्य केले.

### शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कामात भ्रष्टाचार झाला असेल –राहुल गांधी

राहुल गांधी पुढे म्हणाले, दुसरी चूक असू शकते की, पुतळ्याच्या कामात भ्रष्टाचार झाला. चोरी झाली. कदाचित पंतप्रधान यासाठी माफी मागत आहेत. मी ज्याला कंत्राट दिले, त्याने भ्रष्टाचार केला. महाराष्ट्राच्या लोकांसोबत चोरी केली. हे कारण असू शकते. तिसरे कारण असू शकते की, तुम्ही शिवाजी महाराजांचा पुतळा बनवला. त्यांची आठवण म्हणून तुम्ही पुतळा बनवला आणि तो पुतळा उभा राहिली याकडे तुम्ही लक्ष दिले नाही.

मी खात्री देतो की, कदमजींचा हा पुतळा बनला आहे ना, तुम्ही इथे पन्नास, साठ, सत्तर वर्षांनंतर येऊ बघा. तो तुम्हाला इथे दिसेल. शिवाजी महाराजांचा पुतळा बनतो आणि काही दिवसांत भ्रष्टाचार, चुकीच्या व्यक्तीला कंत्राट देण्याच्या कारणामुळे तो पुतळा पडतो. शिवाजी महाराजांचा अपमान केला आहे. पंतप्रधानांनी फक्त शिवाजी महाराजांची माफी मागू नये. जर माफी मागायची असेल, तर महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीची मागायला हवी, असे राहुल गांधी म्हणाले.

## महाराष्ट्रात नवं राजकीय समीकरण; ना महायुती ना मविआ, विधानसभेला तिसरा पर्याय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

महायुती आणि महाविकास आघाडी हे एकाच नाण्याच्या २ बाजू आहेत. महाराष्ट्राच्या जनतेला पर्याय म्हणून आम्ही पुढे येत आहोत. सामान्य व्यक्तीला त्यांच्या हक्काचं बटण देण्याचं काम आम्ही करणार आहोत. लोकसभेत जनतेनं जो निर्णय दिला त्यावर विधानसभेत पुढे जाऊ असं कुणाला वाटत असेल तर ते साफ चुकीचे आहे असं सांगत महाराष्ट्रात नवीन समीकरण उदयास आलं आहे. छत्रपती संभाजीराजे आणि राजरत्न आंबेडकर यांच्यासोबत इतर संघटना लवकरच नवा पर्याय देत निवडणुकीला सामोरे जाणार असल्याची घोषणा संभाजीराजेंनी केली आहे.



मुंबईत छत्रपती संभाजीराजे आणि राजरत्न आंबेडकर यांनी पत्रकार परिषद घेतली, त्यात संभाजीराजे म्हणाले की, महाराष्ट्र खऱ्या अर्थाने आता सुसंस्कृत राहिलाय का हे आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. या ७५ वर्षात नुसत हेवदावे सुरू आहे. महाराष्ट्र कसा घडवू शकतो ?, महाराष्ट्र इतरांना दिशा देण्याचं काम करतो. सध्या लोक अस्वस्थ आहेत. लोकसभेत जनतेनं जो निर्णय दिला त्यावर विधानसभेत पुढे जाऊ असं कुणाला वाटत असेल तर ते साफ चुकीचे आहे. मागील १५-२० दिवसांत जनतेच्या व्यथा समजल्यानंतर आम्ही एक वेगळा पर्याय, ज्यातून सुसंस्कृत महाराष्ट्र घडवण्याच्या दिशेन आमचा प्रवास सुरू झाला आहे असं त्यांनी सांगितले.

## 'आरोग्यवारी'ची जागतिक दखल इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्‌समध्ये नोंद



**विदर्भ प्रजासत्ताक दि.५ पंढरपूर**

पंढरपूरच्या आषाढी वारीत या वर्षी १५ लाखांपेक्षा अधिक वारकऱ्यांची आरोग्यसेवा करण्यात आली. आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनात राज्याच्या आरोग्य विभागाने नवा इतिहास रचला आहे. आरोग्याची वारी पंढरीच्या दारी या महाआरोग्य शिबिराची नोंद इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्डसने घेतली आहे. हा विक्रम महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे. १५ लाखांहून अधिक वारकऱ्यांच्या तपासणीची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडण्यात आली. आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी या संकल्पनेतून डॉ. तानाजी सावंत यांनी सुरू केलेल्या या उपक्रमामुळे पंढरपूरच्या वारीला एक नवी ओळख मिळाली. त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे ज्यामुळे लाखो वारकऱ्यांना तत्काळ उपचार मिळाले.


आरोग्याची वारी पंढरीच्या दारी या महाआरोग्य शिबिरात आषाढी वारीच्या काळात तब्बल १५ लाख १२ हजार ७७४ वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाचे यशस्वी नियोजन आरोग्य विभागाने केले आहे. यासाठी आरोग्य विभागातील वैद्यकिय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.पंढरपूरच्या वारीसाठी दरवर्षी पंढरपुरात लाखो वारकरी दाखल होतात. या दिवसांत बहुधा पाऊस सुरू असतो. शेतीची कामं उरकून वारकऱ्यांची पावलं पंढरीकडं वळतात. शेकडो किलोमीटर पायी चालत जाऊन वारकरी पंढरीच्या विठुरायाचं दर्शन घेतात. या वारीच्या सोहळ्यात अनेकदा आरोग्याच्या सुविधांअभावी वारकऱ्यांची परवड होते. ही गोष्ट लक्षात आल्याने आरोग्य विभागाने यंदा चांगली व्यवस्था केली होती. ठिकठिकाणी आरोग्य तपासणीची व्यवस्था करण्यात आली होती.

तसेच या काळात महाआरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येऊन औषधे देण्यात आली. वारकऱ्यांवर औषधोपचार करण्यात आले. अशा पद्धतीने वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यात आली. वारकऱ्यांनीही सरकारच्या या उपक्रमाचे कौतुक केले. त्यानंतर आरोग्य विभागाच्या या उपक्रमाची नोंद इंटरनॅशनल बूक ऑफ रेकॉर्ड्‌सने देखील घेतली.

## निवडणुकीआधी महाराष्ट्राची चांदी! ७६ हजार कोटींची गुंतवणूक अन् १२ लाख रोजगार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

महाराष्ट्रात लवकरच विधानसभा निवडणुका होणार आहे. या निवडणुकांची तयारीने वेग घेतला आहे. त्यातच राज्य आणि केंद्र सरकारकडून महाराष्ट्रासाठी अनेक प्रकल्प आणि योजनांना मंजुरी दिली जात आहे. या कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पांच्या माध्यमातून लाखोंच्या संख्येत रोजगार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्टही ठेवण्यात आले आहे. केंद्रीय जहाजबांधणी आणि जलमार्ग



मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी सांगितले की पालघर येथे तयार होणारा मेगा प्रोजेक्ट वाढवण पोर्ट अत्यंत महत्वाचा आहे. हा प्रकल्प सुरू झाल्यानंतर जवळपास १२ लाख रोजगार उपलब्ध होतील. या प्रकल्पात दहा बिलियन डॉलर्सची गुंतवणूक करून विकसित केला जात आहे. या माध्यमातून विविध प्रकारच्या सुविधा देखील उपलब्ध होणार असल्याचे मंत्री सोनोवाल यांनी सांगितले.

पालघर येथील वाढवण बंदर प्रकल्पाच्या शिलान्यास समारंभाती मंत्री सोनोवाल म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताने जगभरात एक सागरी राष्ट्र म्हणून नाव कमावले आहे. मागील दहा वर्षांच्या काळात सरकारने सागरी क्षेत्रासाठी अनेक महत्वाच्या योजना सुरू केल्या आहेत.

**महाराष्ट्रासाठी मोदींचं मोठं गिफ्ट**

यामध्ये सार्वजनिक आणि खासगी (पीपीपी) मॉडेलचा वापर करण्यात आला आहे. मुलभूत सुविधा, टर्मिनल आणि वाणिज्यिक सोयीसुविधांचा समावेश आहे. या प्रकल्पाचा पहिला टप्पा २०२९ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. हा प्रकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून महाराष्ट्र आणि देशातील लोकांना मोठं गिफ्ट आहे असे केंद्रीय मंत्री सोनोवाल म्हणाले. या प्रकल्पाच्या माध्यमातून स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. आगामी २५ वर्षांच्या काळात भारताला आत्मनिर्भर बनवण्याच्या उद्देशात हा प्रकल्प महत्वाचा ठरणार असल्याचेही त्यांनी सांगितले.


## राष्ट्रवादीच्या दोन रूपालींमध्ये रंगला 'आमदारकीवरुन' वाद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

रुपाली चाकणकर आणि रुपाली पाटील ठोंबरे पहिल्या रुपाली म्हणजे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा, राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षा आणि दुसऱ्या रुपाली म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश प्रवक्त्या. दोघींना जोडणारा समान धागा म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्या म्हणून दोघींनाही ओळखले जाते. याच दोघी आता आमदारकीवरुन आमने-सामने आल्या आहेत. एकाच व्यक्तीला किती पद देणार असे म्हणत एका रुपालीने दुसऱ्या रुपालीला कडाडून विरोध केला आहे.

नेमका काय आहे हा वाद? आणि अजितदादा कसा तोडगा काढणार? हे बघणे महत्वाचे ठरणार आहे.





गेल्या अडीच वर्षांपासून रखडलेल्या विधानपरिषदेवरील राज्यपाल नियुक्त सदस्यांचा तिढा जवळपास सुटल्यात जमा आहे. सरकारी वकिलांनी येत्या काही दिवसांत प्रक्रिया पूर्ण करू असे आश्वासन मुंबई उच्च न्यायालयाला दिले होते. या अनुषंगाने आता हालचालींना वेग आला आहे. न्यायालयातील निकालानंतर लगेचच मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन राज्यपाल महोदयांना या नावांची शिफारस पाठवली जाणार आहे. त्यानंतर येत्या १४ तारखेला या १२ आमदारांचा शपथविधी होण्याची शक्यता आहे. विधानसभा आचारसंहिता लागण्यापूर्वी या १२ आमदारांची नियुक्ती व्हावी असा या तिन्ही पक्षांच्या नेत्यांचा अट्टाहास आहे.

**जयदीप कुटुंबाला भेटण्यासाठी आला अन् अलगद अडकला पत्नीनेच पोलिसांना दिली टीप**

दरम्यान, या १२ पैकी भाजपने सहा जागांवर दावा केला आहे. तर उर्वरित सहापैकी शिवसेनेला तीन आणि राष्ट्रवादी तीन जागा मिळण्याची शक्यता आहे. यात भाजप आणि शिवसेनेमधील संभाव्य नावे अद्याप समोर आलेली नाहीत. पण राष्ट्रवादीची तीन संभाव्य नावांबाबत माध्यमांमध्ये जोरदार चर्चा आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून माजी खासदार आनंद परांजपे, महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर आणि मुंबई बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे यांच्या नावांची शिफारस केली जाण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीने शिफारस केल्या जाणाऱ्या नावांवर शिक्कामोर्तब झालेले नाही, मात्र हीच नावे अंतिम असल्याची माहिती आहे.

## .....म्हणून दिल्लीच्या गल्लोगल्ली फिरावं लागतंय; एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

बाळासाहेबांचे विचार सोडल्याने आज उद्धव ठाकरेंना दिल्लीच्या गल्लोगल्ली फिरावं लागतंय असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगावला आहे. त्याशिवाय मालवण प्रकरणी राजकारण करणं दुर्दैवी आहे. सातत्याने आरोप करणाऱ्या संजय राऊतांनी ठाण्यातील एका रुग्णालयात दाखल व्हावं असंही मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

मुंबईत पत्रकारांशी मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला. ते म्हणाले की, मालवण प्रकरणी कुणालाही सरकार सोडणार नाही. दोषींना कठोर शिक्षा होईल. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचं आराध्य दैवत, प्रत्येकाच्या मनात त्यांच्याबाबत श्रद्धा, झालेली घटना दुर्दैवी आहे आणि त्यावर राजकारण करणे त्याहून द्रुदैवी आहे. जयदीप आपटे असो वा अन्य कुणीही कायद्यापेक्षा कुणी मोठा नाही. तो कुठेही असेल त्याला पकडू असं मी म्हटलं होते आणि आता त्याला पकडलंय असं त्यांनी सांगितले.



त्याशिवाय विरोधक जे राजकारण करत होते त्यांना जयदीप आपटे अटकेनंतर चपराक मिळाली आहे. जयदीप आपटेची चौकशी होऊन कारवाई होईल. ही घटना दुर्दैवी होती मात्र त्यावर विरोधकांनी राजकारण केले. सरकार छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्यदिव्य पुतळा लवकरात लवकर पुन्हा तिथे उभारेल हे आमचं उद्दिष्ट आहे असं त्यांनी सांगितले. यावेळी संजय राऊतांवर पत्रकारांनी प्रश्न विचारला असता त्यांना ठाण्यातील एका रुग्णालयात उपचाराची गरज आहे असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी लगावला.

दरम्यान, जेव्हा बाळासाहेब ठाकरे होते, तेव्हा दिल्लीहून नेते इथं यायचे आता उद्धव ठाकरेंना दिल्लीच्या गल्लीगल्लीत जावं लागतंय, मला मुख्यमंत्री करा असं सांगावे लागतेय हे पाहून बाळासाहेबांनाही दुःख होत असेल. बाळासाहेबांचा विचार सोडल्यानंतर अशी परिस्थिती झाली आहे. आम्ही बाळासाहेबांचा विचार, आनंद दिघेंचा विचार घेऊन पुढे जातोय. राज्याचा विकास करतोय. राज्यात कल्याणकारी योजनाही आणत आहोत असं मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## शिवाजी आढळराव पाटलांना राज्यमंत्रिपदाचा दर्जा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मंचर**

म्हाडाचे अध्यक्ष माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने तशी अधिसूचना आज काढण्यात आली आहे.



माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांची महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील विभागीय मंडळापैकी पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या सभापती पदावर २३ जुलैला पुनर्नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर आता त्यांना राज्यमंत्रीपदाचा दर्जा देण्यात आला आहे. तसा शासन आदेश महाराष्ट्र शासनाचे उपसचिव अजित कवडे यांनी आज गुरुवारी काढला आहे. राज्यमंत्रीपदाच्या अनुषंगिक सेवा सेवा सुविधा आता त्यांना देण्यात येणार आहे.

दरम्यान सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून कॅबिनेट मंत्रीपद तालुक्याला असतानाच आता आढळराव पाटील यांच्या रूपाने राज्यमंत्रीपद तालुक्याला मिळाले आहे. याद्वारे तालुक्याला दोन मंत्रीपदे मिळाली आहेत. राज्यमंत्रीपदाचा दर्जा मिळाल्यानंतर म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. लांडेवाडी येथील निवासस्थानी अभिनंदन करण्यासाठी कार्यकर्ते मोठ्या संख्येने येऊ लागले आहेत.

## संपादकीय ......

# ज्ञानदानाचा दूत

शिक्षक अवघे विश्व शांततेच्या दिशेने चालत राहावे, यासाठी चालणारा ज्ञानदूत असतो. शिक्षकात सामावलेल्या शक्तीची ओळख करून देण्यासाठी माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनी शिक्षकांच्या आंतरिक मनाला जागृत करण्यासाठी प्रतिज्ञा पेरली आहे. मोठेपणाबरोबर शिक्षकांना जबाबदारीचे भान देणारी ही प्रतिज्ञा प्रत्येकाने अभ्यासायला आणि आचरणात आणायला हवी. त्या पाऊलवाटेने आपण चालू लागलो, तर स्वतःबरोबरच राष्ट्राचे उत्थान फार दूर नाही. आजच्या शिक्षकदिनी या वाटेने चालण्याचा निर्धार केला, तर भविष्य अधिक उज्ज्वल असेल, यात शंका नाही.

शिक्षक हा भूतकाळापासूनच व्यवस्थेसाठी आदर्शवत राहिला आहे. जगाच्या शांततेसाठी आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी मनुष्यबळ विकसित करणारा हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. त्याने मनात आणले तर काय परिवर्तन होते, याचा इतिहास जगाने अनुभवला आहे. शिक्षकांची शक्ती आणि अंगी असलेली भक्तीच राष्ट्राचे उत्थान घडवू शकते. त्यासाठी देशातील शिक्षक अधिक ज्ञानसंपन्न आणि जबाबदारीची जाणीव असणारे असायला हवेत. बालकांच्या आणि तरुणांच्या मनात विकासाची स्वप्ने पेरणारा शिक्षकच असतो. सर्जनशीलतेने विज्ञान, साहित्यात भरारी घेण्यासाठी मनावर पेरणी करणारा शिक्षक असतो. विकासाची दृष्टी देणारा शिक्षक असतो. शक्ती देणारा शिक्षक असतो. विकासाला माणूसपणाची जोड देणारा शिक्षक असतो. राधाकृष्णन यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारतात प्रयत्न करण्याची गरज अधिक अधोरेखित होऊ लागली आहे. अलीकडच्या काळात शिक्षकांसाठीचा विचार करताना सातत्याने जबाबदारीचे भान आणि कर्तव्याची भावना जागृत करण्याची अपेक्षा केली जात आहे. शिक्षकांच्या हाती असलेला विचार आणि शक्ती आपण समजावून घेतली, तर जगात परिवर्तनाची वाट चालणे सहज शक्य आहे. शिक्षकांच्या पेरलेल्या विचारातून जीवन समृद्धीचा प्रवास सुरू करणे शक्य होईल. शिक्षकांसाठी विद्यार्थी हा महत्त्वाचा घटक आहे. विद्यार्थ्यांशी सातत्याने संवाद साधणे, ही शिक्षकांना आवडणारी गोष्ट असायला हवी. शिक्षकांप्रति असलेली मनातील भावना म्हणजे शिक्षकांच्या प्रति असलेला आदरभाव व्यक्त करणे आहे. तो आदरभाव का, हे सांगताना डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी म्हटले आहे की, माझ्या आयुष्यात जे काम शिक्षकांनी केले आहे. त्यातील मनापासून केलेले अध्ययन, अध्यापन आहे. खरा शिक्षक तर विद्यार्थ्यांच्या प्रेमासाठीच जगत असतो. नवनवीन पद्धतीने अध्यापन, तंत्र, अध्ययन अनुभवाची रचना जशी स्वतःला समृद्ध करते त्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या आयुष्याला संस्कारित करत असते. त्यामुळे निर्माण होणारा आनंद हा शिक्षकांना आनंद देत असतो. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांनाही शिकण्यात अधिक समाधान देऊन जात असतो.

कामावरील निष्ठा असल्याने पेशावर प्रेम घडणे साहजिक असते. त्या प्रेमाच्या मार्गानेच ते त्यातून स्वतःचा आनंद शोधत असतात. प्रत्येक काम आनंदाने करणे गरजेचे असते. निष्ठा असेल तर आपण त्या दिशेने अधिक समृद्धतेचा प्रवास करत जातो. परिचयहीही अधिक संपन्नतेने व्हावा, याकरिता शिक्षक कार्यरत राहतो. विद्यार्थी हे त्यांच्यासाठी सर्वस्व असतात. त्याच्या विकासात शिक्षकांचे अनन्यसाधारण योगदान असते. विद्यार्थ्यांच्या प्रति असलेले प्रेमच त्यांच्यासाठी प्रेरक असते, त्यामुळे शिक्षकांची निष्ठा स्वतःच्या व्यवसायाशी जितकी अधिक असेल तितका आदरभाव अधिक असणार आहे. शिकवण्यावर माझे प्रेम आहे, असे सांगताना अध्यापन किती महत्त्वाचे आहे, हे अधोरेखित होते. भारतीय तत्त्वज्ञानाप्रति असलेली पाश्चात्त्यांच्या दृष्टिकोनातही त्यांनी मूलभूत परिवर्तन करण्याचे काम केले आहे. शिकवण्यावर प्रेम असणारा माणूस आपण जे शिकवितो, त्या घटकाभोवतीचा भवताल जाणून शिकविण्याचा प्रयत्न करत असतो. त्या शिकविण्यावरती त्याचे अखंड प्रेम असते आणि त्यांच्या प्रत्येक कृतीत विद्यार्थ्यांचे हित सामावलेले असते. शिकवलेले विद्यार्थ्याच्या गळी उतरवण्यासाठी अनेकदा नावीन्यपूर्ण प्रयत्न केले जात असतात. एखाद्या विद्यार्थ्याला जोपर्यंत समजत नाही, तोपर्यंत मी शिकवत राहीन, असे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी म्हटले होते.

# यंदा गणेशोत्सव दहा की अकरा दिवसांचा

## पंचांगकर्ते मोहन दातेंनी दिली माहिती!




**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक–** शनिवार ७ सप्टेंबर रोजी भाद्रपद शु. चतुर्थीच्या दिवशी सर्वत्र श्रीगणेश चतुर्थी साजरी केली जाणार आहे. या दिवशी ब्रह्ममुहूर्तापासून म्हणजे पहाटे ४:५० ते दुपारी १:५१ पर्यंत आपल्या आणि गुरुजींच्या सोयीने घरात गणेश मुर्तीची प्रतिष्ठापना व पूजन करता येणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या गणेश मूर्तिंची प्रतिष्ठापना मध्याह्नानंतर देखील करता येऊ शकतात अशी माहिती पंचागकर्ते मोहन दाते यांनी लोकमतशी बोलताना सांगितले.

दरम्यान, मंगळवार १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी आहे. हा गणेश स्थापनेपासून ११ वा दिवस असल्याने ज्यांच्याकडे अनंत चतुर्दशीचे दिवशी विसर्जन केले जाते, त्यांच्याकडे ११ दिवसांचा उत्सव असेल, तसेच या दिवशी मंगळवार म्हणजे गणेशाचा वार असला तरीही परंपरेप्रमाणे विसर्जन करावे असेही दाते यांनी सांगितले. विसर्जनाच्या वेळेस गणपती बाप्पा मोरया.. पुढच्या वर्षी लवकर या अशा घोषणा देत असतो, त्याप्रमाणे पुढच्या वर्षी गणपती बाप्पा खरंच लवकर म्हणजे २७ ऑगस्ट २०२५ रोजी येणार आहेत. अशी माहिती पंचांगकर्ते मोहन दाते यांनी दिली आहे.

### गौरी पूजेचा मुहूर्त

१० सप्टेंबर रोजी मंगळवारी अनुराधा नक्षत्रावर रात्री ८ वाजून ४ मिनिटांपर्यंत कधीही गौरी आवाहन करता येईल. ज्येष्ठा नक्षत्र मध्याह्नी असलेल्या दिवशी पूजन करावे असे असल्याने ११ सप्टेंबर रोजी बुधवारी नेहमीप्रमाणे गौरी पूजन करावे आणि मूळ नक्षत्रावर विसर्जन करावयाचे असल्याने १२ सप्टेंबर रोजी गुरुवारी रात्री ९:५३ पर्यंत गौरी विसर्जन करता येईल.

# सण सौभाग्याचा



**दि.५विदर्भ प्रजासत्ताक** हरतालिका व्रत हे भगवान शिव आणि माता पार्वतीला समर्पित आहे. पंचांगानुसार भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील तृतीया तिथीला हरतालिका व्रत पाळले जाते. असे मानले जाते की या व्रताच्या प्रभावामुळे अखंड सौभाग्य प्राप्त होते. या दिवशी भगवान शिव आणि माता पार्वतीची पूजा केली जाते.

विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी निर्जल राहून माता पार्वती आणि भगवान शिव यांची पूजा करतात. पौराणिक मान्यतेनुसार, माता पार्वतीने भगवान शिव प्राप्त करण्यासाठी हे व्रत ठेवले होते. त्यानंतर भगवान शिव पार्वतीला पती म्हणून प्राप्त झाले होते. शास्त्रानुसार, अविवाहित मुलींनीदेखील हे व्रत पूर्ण भक्तिभावाने पाळले तर त्यांना इच्छित वर मिळतो अशी मान्यता आहे.

या वर्षी उद्या शुक्रवार ६ सप्टेंबर रोजी शुभ योग-संयोगात हरतालिका हे व्रत केले जाईल. या दिवशी उपवास आणि मनोभावे पूजा करतात.

# संत्रा व मोसंबी फळ पिकांतील बुरशीजन्य फळगळीचे व्यवस्थापन कसे कराल?

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक–** सद्यस्थितीत आंबिया बहाराची फळे ही विकसनशील अवस्थेत आहेत पावसाळी हवामानात सततचा रिमझिम पाऊस व ढगाळ वातावरण हे बुरशीजन्य रोगांच्या संक्रमनास पोषक आहे.

देठ सुखी, पानावरील डाग, पानगळ व फळांवर तपकिरी डाग रोगाला कारणीभूत असलेल्या बुरशीला पावसाळी वातावरण अनुकूल असल्याने यांचा प्रकोप होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे लिंबूवर्गीय उत्पादक यांनी सतर्क राहून बगिच्यातील विकृती व फळगळीचे लक्षणे जाणून त्याप्रमाणे उपाययोजना करणे गरजेचे आहे.

१) फायटोफ्थोरा बुरशीचे संक्रमण झाल्यास दिसणारी लक्षणे

– फायटोफ्थोरा बुरशी वाढीस अनुकूल वातावरण असल्यास या बुरशीमुळे लिंबूवर्गीय फळ पिकावर पानावरील चट्टे लक्षणे तसेच तपकिरी कुज किंवा फळावरील कुज किंवा ब्राऊन रॉट रोग उद्भवतो.

– सदर रोग फायटोफ्थोरा पाल्मिव्होरा आणि फायटोफ्थोरा निकोशियानी या दोन प्रजातीमुळे उद्भवतो.

**अ) पानावरील चट्टे लक्षणे**

– पावसाळ्यात जमिनीलगतच्या फांद्यावरील पाने व फळांना या बुरशीची लागण सर्वप्रथम होते.

– यामुळे पाने टोकाकडून करपल्या सारखी व मलूल होतात अशी पाने हातात घेतली असता त्यांचा चुरा केला असता त्यांची घडी होते मात्र पाने फाटत नाहीत.




– टोकाकडून झालेले संक्रमण पूर्ण पानावर होऊन पाने तपकीरी काळे होतात नंतर अशी पाने गळून झाडाखाली त्यांचा खच पडतो.

– फांद्या पर्ण विरहित होतात. परिणामी अकाली फळगळ होते.

ब) फळावरील तपकिरी रॉट किवां फळावरील कुज लक्षणे

– पानांवर लागण झाल्यानंतर जमिनी लगतची हिरवी असलेली फळे यावर तपकिरी/करड्या डागांची सुरूवात होते, फळे एकाबाजूने करपण्यास सुरूवात होते.

– फळाच्या हिरव्या आवरणास संक्रमण होऊन पूर्ण फळ हे तपकिरी काळ्या रंगामध्ये परावर्तीत होते व फळे सडून गळतात या फळ सडीच्या अवस्थेस 'ब्राऊन रॉट' किवां तपकिरी रॉट असे संबोधतात.



संत्रा, मोसंबीची फळगळ

– फळे खाली पडल्यानंतर फळांच्या पृष्ठभागावर पांढऱ्या बुरशीची वाढ दिसून येते.

– करड्या रंगाची फळे यांची तोड केल्यानंतर ते निरोगी फळात मिसळल्यास निरोगी फळे पण सडतात.

**२) देठ सुकणे किंवा कोलेटोट्रीकम स्टेम एंड रॉट**

– कोलेटोट्रीकम बुरशीमुळे संत्रा फळाच्या देठाजवळ काळी रींग तयार होऊन तो भाग काळा पडतो व भाग नंतर वाढत जातो व संपूर्ण फळ सडते.

– कोवळ्या फांद्यावरील पाने सुकणे व ती वाळणे ही या रोगाची सुरूवातीची लक्षणे आहेत.

– बरेचदा उशिरा झालेल्या संसर्गामुळे रोगग्रस्त फळे संकुचीत होतात, काळे पडतात, वजनाने हलके होऊन कडक होतात आणि दीर्घ काळापर्यंत देठांना लटकत राहतात.

**व्यवस्थापन**

– वाफे केलेले असल्यास त्यात पाणी साचून राहते ती मोडून टाकावीत. बागेच्या उताराच्या बाजूने शेतातील पाणी बाहेर काढावे.

– सर्वप्रथम झाडांवर गळून पडलेल्या पानांची व फळांची विल्हेवाट लावावी ती शेतात तशीच राहू देऊ नये अन्यथा या रोगाची तीव्रता वाढण्यास मदत होऊन संक्रमण जलद गतीने होते. वाफा स्वच्छ ठेवावा.

– फळबागेत फळांचे ढीग कुठेही ठेवू नका कारण ते कीड व रोगाचे प्रसार करण्याचे काम करतात.

– फायटोप्थोरा बुरशीमुळे होणाऱ्या पानगळ व फळावरील तपकिरी कुज 'ब्राऊन रॉट' चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संपूर्ण झाडावर फासिटील ए.एल. २.५ ग्रॅम किवां कॉपर ऑक्सीक्लोराईड ५० डब्लुपी ३ ग्रॅम प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी.

– फवारणी करतांना झाडाच्या परिघातामध्ये सुद्धा फवारणी करावी जेणेकरून खाली पडलेली फळे उचललेली नसल्यास त्यावरील बुरशीचा नायनाट होईल तसेच जमिनीमधील सक्रिय बिजाणू यांचा नायनाट होण्यासाठी मदत होईल.

– चांगले परिणाम मिळण्यासाठी या औषधामध्ये इतर कोणतेही तत्सम बुरशीनाशके/किटकनाशके/विद्राव्य खते मिसळू नये.

– रासायनिक औषधे फवारणीनंतर १५ दिवसाच्या नंतर ट्रायकोडर्मा हार्जियानम* अधिक सुडोमनास फ्लूरोसन्स* १०० ग्रॅम प्रत्येकी प्रति झाड १ किलो शेणखतात मिसळून झाडाचे परिघातात जमिनीतून द्यावे.

– कोलेटोट्रीकम बुरशीजन्य फळगळसाठी बोर्डेक्स ०.६ टक्के मिश्रणाची किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी* २.५ ग्रॅम किंवा अझोक्सस्ट्रोबिन + डायफेनकोणाझोल* १ मि.लि. प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी.

(नोंदः *संशोधनावर आधारीत लेबल क्लेम नाही)




## किचनमधले २ पदार्थ नियमित वापरा; डार्क स्पॉट्स, पिगमेंटेशन गायब– चेहऱ्यावर येईल नॅचरल ग्लो

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक** बहुतांशजणी अशा असतात की त्या आपल्या रोजच्या कामांमध्ये खूप अडकून गेलेल्या असतात. त्यामुळे स्वतःच्या त्वचेकडे, सौंदर्याकडे लक्ष देण्यासाठी त्यांना वेळच नसतो. त्यामुळे मग कमी वयातच चेहरा डल दिसू लागतो, चेहऱ्यावरचे ओपन पोअर्स, पिगमेंटेशन वाढतात डोळ्यांखाली डार्क सर्कल येतात तसेच क्ने आणि पिंपल्सचाही त्रास होतो. असे सगळे प्रॉब्लेम्स चेहऱ्यावर दिसू लागले की मग आपोआपच चेहऱ्यावरचा ग्लो कमी होतो. तुमच्याही बाबतीत असंच झालं असेल तर इतर काहीही न करता फक्त २ पदार्थ नियमितपणे चेहऱ्यावर लावात्यामुळे तुमच्या त्वचेच्या बऱ्याचशा समस्या कमी होतील आणि चेहऱ्यावर छान नॅचरल ग्लो येईल.

पिगमेंटेशन जाऊन चेहऱ्यावर ग्लो येण्यासाठी घरगुती उपाय

चेहऱ्यावरचे पिगमेंटेशन, क्ने, पिंपल्स, डार्कस्पॉट्स जाऊन चेहऱ्यावर छान ग्लो यावा असं वाटत असेल तर त्यासाठी कोणते २ पदार्थ नियमितपणे चेहऱ्यावर लावावेत याविषयी माहिती सांगणारा एक व्हिडिओ पेजवर शेअर करण्यात आला आहे. ते २ पदार्थ नेमके कोणते ते पाहा...

**१. बटाट्याचा रस–** बटाट्याचा रस हा नॅचरल ब्लिचिंग एजंट म्हणून ओळखला जातो. तुमच्या चेहऱ्यावर पिगमेंटेशन असतील चेहऱ्यावर खूप जास्त टॅनिंग असेल तर बटाट्याचा रस नियमितपणे चेहऱ्याला लावा.

मुलतानी माती, बेसन अशा




कोणत्याही फेसमास्कमध्ये टाकून तुम्ही बटाट्याचा रस चेहऱ्यासाठी वापरू शकता. बटाट्याचा रस आणि एलोवेरा जेल हे मिश्रण एकत्र करून डोळ्यांभोवती लावल्यास डार्क सर्कल्स बऱ्याच प्रमाणात कमी होतात.

**२. राईस वॉटर** – चेहऱ्यावर छान नॅचरल ग्लो पाहिजे असेल तर राईस वॉटरसारखा दुसरा पर्याय नाही. त्वचेचे सौंदर्य खुलवण्यासाठी हा एक अतिशय स्वस्तात मस्त उपाय आहे. राईस वॉटर आणि गुलाब जल समप्रमाणात घ्या आणि एका स्प्रे बॉटलमध्ये भरून फ्रिजमध्ये ठेवा. रात्री झोपण्यापूर्वी चेहरा धुऊन हा स्प्रे चेहऱ्यावर मारा. त्वचेसाठी हे एक उत्तम टॉनिक असून त्यामुळे चेहऱ्यावर छान ग्लो येण्यास निश्चितच मदत होईल.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा तान्हा पोळा बाल शेतकऱ्यांची अवतरली मांदियाळी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती –** राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे मंगळवारी ३ सप्टेंबरला बालगोपालांच्या तान्हा पोळा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये शेकडो बाल स्पर्धकांनी सहभाग दर्शवला.

यामध्ये प्रथम क्रमांक वेदांत शिलार, द्वितीय आनंदी राऊत, तृतीय क्रमांक सक्षम शेंद्रे, चौथा लक्षित जोशी, पाचवा ओम काळे, तर सहावा पद्मश्री नखाते आणि सोनाक्षी हल्लुमारे यांनी संयुक्तरित्या पटकावला. या प्रसंगी एकूण ५१ बक्षीसांचे वितरण करण्यात आले. यामध्ये मोठ्या संख्येने बाल शेतकारी सहभागी झाले होते.

श्री रामदेव बाबा मंदिर परिसरात आयोजित या कार्यक्रमाप्रसंगी मंचावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यकारणी सदस्य चंद्रशेखर राठी, गौरक्षण संस्थांनचे अध्यक्ष नंदकिशोर राठी, कथावाचक सुरज शर्मा, ज्येष्ठ आरपीएफ बलराज मारवे, संयोजक कमल छांगाणी, तर परीक्षक म्हणून प्रवीण बंब, निकिता ठाकरे, राजेश झुटी व अर्चना शेंद्रे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेची पूजन व स्व. नानाजी देऊळकर यांना अभिवादन करून करण्यात आली. या प्रसंगी चंद्रशेखरजी राठी नंदकिशोर राठी, बलराज मारवे,पं. सुरज शर्मा यांनी बालकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय कमल छांगाणी, सूत्रसंचालन दर्शन राठी व निखिल पनपालिया, तर आभार नगर कार्यवाह चेतन पोळ यांनी मानलेत. या प्रसंगी मोठ्या संख्येने चिमुकल्या स्पर्धकांसह पालक व नागरिक उपस्थित होते.



### संघाचे कार्य कौतुकास्पद : राठी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कौतुकास्पद कार्य करीत असून तान्हा पोळा हे सुद्धा बालकांच्या कलागुणांना वृद्धिंगत करणारे असून कौतुकास्पद असल्याचे मत या प्रसंगी गौरक्षण संस्थेचे अध्यक्ष नंदकिशोर राठी यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. ५ सप्टेंबर २०२४

शहर/ग्रामिण


# गौतमी पाटील म्हणते ... मुलींनो बिनधास्त लढा, आवर्जून नडा, कुणाच्या दबावाखाली राहू नका

## महिला अत्याचाराबाबत गौतमी पाटीलचं वक्तव्य



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती: –** गेल्या काही दिवसांमध्ये राज्यातील विविध भागातील महिला अत्याचाराच्या घटनांमुळे राजकीय आणि सामाजिक वातावरण तापले आहे. अनेकजण महिला अत्याचाराच्या वाढत्या घटनांबाबत चिंता व्यक्त करताना दिसत आहेत. राज्यातील मुली आणि महिला सुरक्षित आहेत की नाही, असा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध नर्तिका गौतमी पाटील हिने भाष्य केले. मुलींनो कोणालाही घाबरु नका, बिनधास्त लढा, असा सल्ला गौतमी पाटीलने दिला. गौतमी बुधवारी एका कार्यक्रमाच्यानिमित्ताने अमरावतीमध्ये आली होती. यावेळी तिने प्रसार माध्यमांशी संवाद साधला.गौतमी पाटील हिला राज्यातील महिला अत्याचाराच्या घटनांबाबत विचारण्यात आले. यावेळी तिने म्हटले की, गेल्या काही दिवसांत आपण महिला अत्याचाराच्या घटना बघितल्या आहेत. इथे बाहेरगाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांना मी सांगू इच्छिते की, स्वतःची काळजी घ्या. लढायचं राहिलं तर बिनधास्त लढा. कुणाच्या दबावाखाली राहू नका, आवर्जून नडा, असे गौतमी पाटीलने म्हटले. तसेच मी राजकारणात अजिबात जाणार नाही, असेही गौतमी पाटीलने स्पष्टपणे सांगितले.

मी राजकारणात जाणार नाही: गौतमी पाटील

अमरावतीत ही माझी पहिलीच वेळ आहे आणि इथे मिळालेले प्रेम बघून मला खूप बरं वाटले. प्रेक्षकांचं आणि महिला वर्गाचं प्रेम बघून छान वाटलं. मी यापूर्वी देखील सांगितलेलं आहे, माझा आणि राजकारणाचा काही संबंध नाही. मी एक कलाकार आहे. मी कला दाखवते. मी राजकारणात अजिबात जाणार नसल्याचे ती म्हणाली.

# युवकांना प्रशिक्षणासह विद्यावेतन ; राज्यात अमरावती जिल्हा अव्वल

## ३४०० युवकांना योजनेचा लाभ : मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती :–** युवकांना शिक्षण पूर्ण झाल्यावर शासकीय, निमशासकीय, खाजगी आस्थापनांवर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळवण्याची क्षमता वाढवण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राज्यात राबवण्यात येत आहे. यामध्ये जिल्हाधिकारी सौरभ कटियार व सीईओ संजिता महापात्र यांच्या मार्गदर्शनात कौशल्य विकासच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांच्या दमदार कामगिरीने राज्यात अमरावती जिल्हा अव्वल ठरला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात, जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत ३१ ागस्टला महाराष्ट्रात पहिला ाफलाइन निवड कॅम्प घेऊन योजनेच्या अंमलबजावणीची जोरदार सुरुवात करण्यात आली. लगेच सीईओ संजिता महापात्र यांच्या पुढाकारात जिल्हा परिषद अंतर्गत सर्व ग्रामपंचायत, शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, पशुवैद्यकीय दवाखाना या प्रत्येक आस्थापनेवर एक प्रशिक्षणार्थी घेण्याचा निर्णय घेतल्याने ग्रामीण भागातील तरुणाईला या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी म्हणून काम करण्याची संधी मिळाल्याचे वास्तव आहे.सद्य:स्थितीत जिल्ह्यातील ३३६९ उमेदवार महापालिका, समाज कल्याण, आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण विभाग, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, समाज कल्याण, कोषागार विभाग, पशुसंवर्धन विभाग अशा अनेक शासकीय आस्थापनांमध्ये युवा कार्यप्रशिक्षणार्थी योजनेचा लाभ घेत आहेत. शिवाय खाजगी क्षेत्रातही विविध कंपनी, हॉस्पिटल्स व महाविद्यालयामध्येसुद्धा प्रशिक्षणार्थी रुजू झाले आहेत. याचाच परिणाम म्हणून सध्या ानलाइनमध्ये महाराष्ट्रात अमरावती जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे. यामध्ये या विभागाच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांच्या नेतृत्वात संपूर्ण टीमने रात्रंदिवस काम केल्याचे वास्तव आहे.



मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे जिल्ह्यातील ऑनलाइन काम राज्यात अव्वल ठरले आहे. यामध्ये युवक उमेदवारांना कामाच्या प्रशिक्षणासह विद्यावेतन मिळत आहे.

**– सौरभ कटियार,** जिल्हाधिकारी.

**उमेदवारांना विद्यावेतन (सहा महिन्यांसाठी)**

**बारावी पास : ६००० रुपये, प्रतिमहिना**

**पदविका / आयटीआय : ८००० रुपये, प्रतिमहिना**

**पदवीधर / पदव्युत्तर : १०००० रुपये, प्रतिमहिना**

शासकीय, निमशासकीय आस्थापनांना त्यांच्या मंजूर पदांच्या ५ टक्के, खाजगी उद्योग, सेवा क्षेत्रात कार्यरत मनुष्यबळाच्या अनुक्रमे १० आणि २० टक्के उमेदवार कार्यप्रशिक्षणासाठी घेता येतात. या योजनेचा कालावधी सहा महिन्यांचा असून राज्याचे रहिवासी असलेले १८ ते ३५ वयोगटातील विहित शैक्षणिक पात्रता धारण करणारे युवक, युवती या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत. प्रशिक्षणार्थी उमेदवारास विद्यावेतन मिळत आहे.

# गणेशोत्सव, ईद ए मिलादसाठी पोलिस अर्लट

## आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांवर कठोर कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** शहरात साजरा होणाऱ्या आगामी गणेशोत्सव व ईद ए मिलादसाठी पोलिस अर्लट झाले असून सार्वजनीक शांतता भंग होईल, अशा कोणत्याही पोस्ट सोशल मिडीयावर टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यातयेणार आहे. यासह शोभा यात्रामध्ये आक्षेपार्ह गाणी वाजविणे, घोषणाबाजी करणे व फलक लावण्यात बंदी करण्यात आले आहे. याबाबत सीपी रेड्डी यांनी आज ४ सप्टेंबर रोजी अधिसुचना जाहीर केली आहे. सीपी रेड्डींच्या अधिसुचनेनुसार, शहरात ७ सप्टेंबर पासून गणोशोत्सव साजरा होणार आहे.गणेशोत्सवा दरम्यानच १६ सप्टेंबरला ईद ए मिलादचा कार्यक्रम आहे. गणोशोत्सवा दरम्यान मोठया प्रमाणात

रॅली निघतात, देखावे लागवण्यात येतात. तसेचशहरात आंदोलनही होतात. त्यामुळे अमरावती पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत धार्मिक, सांस्कृतीक कार्यक्रम, मिरवणूक,शोभा यात्रा, आंदोलना दरम्यान आक्षेपार्ह घोषणबाजी करणे, गाणे वाजविणे, शस्त्र व ज्वलनशील पदार्थ बाळगणे, प्रर्दशन करणे, मनुष्याच्या जिवितास धोमका निर्माण होईल किंवा गर्दी होऊन हाणामारी होईल,जातीय एकोप्याला धोका निर्माझा होईल, या सर्व प्रकाराला बंदी घालण्यात आली आहे. तसेच अशाप्रकारच्या पोस्ट सोशल मिडीयावर अपलोड करणाऱ्यावर कठोर कारवाई होईल, असे सीपींच्या अधिसुचनेमध्ये नमूद आहे.

# विघ्न टळले : संप मागे, एसटीने जाता येणार गावी

## कर्मचाऱ्यांना ६,५०० रुपयांची सरसकट पगारवाढ




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ मुंबई –** ऐन गणपतीच्या तोंडावर एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर बुधवारी रात्री मागे घेतला. कर्मचारी कृती समितीसोबत झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री शिंदे यांनी १ एप्रिल २०२० पासून सरसकट ६५०० रुपये वेतनवाढ देण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर दोन दिवस चाललेला संप मागे घेतल्याची घोषणा केली.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन देण्याच्या मागणीसह इतर प्रलंबित मागण्यांसाठी एसटी कर्मचाऱ्यांनी मंगळवारी धरणे आंदोलन केले. त्या आंदोलनाचे अचानक संपात रूपांतर झाले. त्यामुळे ऐन गणेशोत्सवाच्या तोंडावर मागील दोन दिवस राज्यभरातील एसटी सेवा ठप्प झाली होती. एसटी कर्मचाऱ्यांना मिळालेल्या या वेतनवाढीमुळे एसटी कर्मचारी कृती समितीने मुख्यमंत्री आणि सरकारचे आभार मानले आहेत. एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या संपामुळे बुधवारी राज्यभरातील जवळपास ९६ आगार बंद होते. संपामुळे एसटीच्या ४०,०६९ पैकी २७,४७० फेऱ्या रद्द झाल्या. एसटीचा बुधवारी २२ कोटी रुपयांचा महसूल बुडाला. तर मंगळवारी १६ ते १५ कोटींचे नुकसान एसटीला सोसावे लागले.

राज्यातील २ हजार एसटी कर्मचाऱ्यांवर विविध कारणांमुळे झालेली निलंबनाची कारवाई मागे घेण्याचे तसेच एसटी आगारातील कर्मचाऱ्यांच्या विश्रांतीगृहांची कामे करण्याचे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिले.

# सोयाबीन, हरभऱ्याच्या दरात पहिल्यांदा वाढ; हंगामपूर्व दिलासा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती**

सणासुदीच्या दिवसात सातत्याने दरवाढ होत आहे. मात्र,मिळाला आहे. सोयाबीनला वर्षभरात हमीभावदेखील मिळालेला नाही. चार हजार रुपये क्विंटलवर दर स्थिरावले होते. आता महिन्याभरात हंगाम सुरू होत असताना सोयाबीनला ४६०० रुपयांवर दर मिळाला आहे.

शिवाय पाच-साडेपाच हजारांवर स्थिरावलेल्या हरभऱ्यालाही पहिल्यांदा ७५०० रुपयांपर्यंत दर

गतवर्षीच्या हंगामात सरासरीपेक्षा कमी पावसामुळे सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झालेले आहे. त्यामुळे सरासरी उत्पन्नात कमी आल्याने मागणी वाढून दरवाढ होईल, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती. प्रत्यक्षात सोयाबीनला वर्षभरात हमीभाव मिळालेला नाही. काही शेतकऱ्यांनी दरवाढीच्या प्रतीक्षेत सोयाबीनची साठवणूक केली होती.

मात्र, दरवाढ होत नसल्याने त्यांनी मिळेल त्या भावात सोयाबीनची विक्री केली. आता दरवाढ होत असल्याने शेतकऱ्यांना फायदा न होता व्यापाऱ्यांनाच फायदा होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

यंदा केंद्र शासनाने सोयाबीनला ४८९२ रुपये हमीभाव जाहीर केलेला आहे.

**सोयाबीनचा बाजारभाव (रु./क्विं.)**

| | |
|---|---|
| २१ ऑगस्ट : | ४१०० ते ४१६९ |
| २३ ऑगस्ट : | ४०५० ते ४१५० |
| २६ ऑगस्ट : | ४१५० ते ४२५६ |
| २८ ऑगस्ट : | ४२५१ ते ४३५१ |
| ३० ऑगस्ट : | ४२७० ते ४३७६, |
| ०४ सप्टेंबर : | ४५०० ते ४६०० |

त्यामुळे सोयाबीनला सद्यस्थितीत मिळत असलेला ४६०० रुपये क्विंटल हा दर हमीभावापेक्षा कमीच आहे.

कलर बॉक्ससणासुदीच्या दिवसात हरभऱ्याची दरवाढ

दोन महिन्यांपासून सणासुदीचे दिवस आहेत. त्यामुळे चणाडाळीची मागणी वाढली व पर्यायाने हरभऱ्याचीही दरवाढ झालेली आहे. नवीन हरभरा मार्केटमध्ये विक्रीला यायला चार ते पाच महिन्यांचा अवधी आहे. त्यामुळे ही दरवाढ कायम राहण्याची शक्यता आहे. आता महिन्याभरात हंगाम सुरू होत असताना सोयाबीनला ४६०० रुपयांवर दर मिळाला आहे. आता दरवाढ होत असल्याने शेतकऱ्यांना फायदा न होता व्यापाऱ्यांनाच फायदा होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. येथील बाजार समितीमध्ये बुधवारी १०४ पोत्यांची आवक झाली.

# हवामान विभाग म्हणतो ...

## संपूर्ण विदर्भात पावसाचा यलो अलर्ट

### विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस पडणार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५पुणे** राज्याच्या काही भागात पावसानं धुमाकूळ घातचला आहे. अनेक ठिकाणी पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. नदी नाल्यांना पूर आले आहेत. तसेच धरणांच्या पाणीसाठ्यात देखील मोठी वाढ झाली आहे. दरम्यान, हवामान विभागानं (खचऊ) दिलेल्या माहितीनुसार, आजही राज्यातील काही भागात जोरदार पावसाची शक्यता आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, आज विदर्भात पावसाचा यलो अलर्ट दिला आहे.

**संपूर्ण विदर्भात पावसाचा यलो अलर्ट जारी** – हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार दिलेल्या माहिततीनुसार, आज राज्यातील काही भागात जोरदार पावसाची शक्यता आहे. विदर्भातच आजही पावसाचा जोर कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. आज संपूर्ण विदर्भात पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. त्यामुळं या भागात मुसळधार पावसाची शक्यता आहे. विदर्भात आज विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# अखेर शिल्पकार जयदीप आपटे याला कल्याणमधून अटक



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ कल्याण–**

सिंधुदुर्ग येथील राजकोट येथे उभारण्यात आलेला पूर्णाकृती छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना घडली होती. या पुतळ्याचा शिल्पकार जयदीप आपटे याला बुधवारी सायंकाळी कल्याण येथून अटक करण्यात आली आहे.

सिंधुदुर्ग राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर जनमानसात संतप्त लाट उसळली. या घटनेनंतर पुतळ्याचा शिल्पकार जयदीप आपटे याला अटक करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती. आपटे याच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटना घडल्याच्या दिवसापासून आपटे पसार झाला होता. आपटे याच्या अटकेसाठी पोलिसांनी विविध तपास पथके तयार केली होती. घटना घडल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून आपटे याच्या कल्याणमधील बाजारपेठ परिसरातील घराला कुलूप होते. त्याच्या घरासमोर संभाजी ब्रिगेड यांनी आंदोलन करून त्याच्या घरावर शिवद्रोही असे लिहिण्याचा त्याचा फोटो चिटकवण्यात आला होता. त्याच्या घरासमोर अंडी फोडून निषेध करण्यात आला होता. त्यानंतर त्याच्या पत्नीची पोलिसांनी चौकशी केली. आपटे यांच्या विषयी माहिती घेतली होती. तसेच त्याच्या पत्नी त्यांच्या कल्याणमधील घरी परतल्या होत्या.

### जयदीप आपटे यांना तात्काळ अटक

पोलीस पथके मागावर होती. बाजारपेठ पोलिसांना आज अशी माहिती मिळाली की, आपटे हा त्याच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी त्याच्या कल्याणमधील बाजारपेठे येथील घरी येणार आहे. पोलिसांनी आपटेला त्याच्या घरी येतानाच अटक केली आहे. आपटेला अटक करून तात्काळ पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ यांच्या कार्यालयात हजर केले आहे. पोलिसांकडून त्याची पुढील चौकशी सुरू करण्यात आली आहे.

# अमरावती विद्यापीठात विद्यार्थ्यांना विना अट कॅरी ऑन लागू

## विद्यार्थी सेनेच्या आंदोलनाला यश, विद्या परिषदेच्या बैठकीत प्रस्ताव मान्य

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती – :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने शैक्षणिक सत्र २०२४-२५ या वर्षासाठी विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना विना अट कॅरी ऑन लागू करण्यात आला आहे. कॅरी ऑनच्या मागणीसाठी विद्यार्थी सेनेच्या वतीने विद्यापीठात ३ सप्टेंबरला आंदोलन केले. यावेळी शेकडोच्या संख्येत उपस्थित विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची दखल घेत कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी विद्यार्थ्यांना भेट देत त्यांची मागणी समजून घेतली तसेच विद्या परिषदेच्या बैठकीमध्ये कॅरी ऑनच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत द्वितीय व तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना कॅरी ऑन देण्यासंदर्भातील मागणी गेल्या अनेक दिवसांपासून विविध विद्यार्थी संघटनांच्या माध्यमातून करण्यात येत होती. विद्यापीठातील मूल्यांकन



पद्धतीमध्ये दोष असल्याने विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. मूल्यांकनकर्ते चुकीच्या पद्धतीने मूल्यांकनामध्ये हलगर्जीपणा बाळगल्याने अभ्यास करूनही विद्यार्थी नापास झाल्याचे विद्यार्थी सेनेचे म्हणणे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी कॅरी ऑन देण्याची मागणी सातत्याने विद्यापीठाकडे लावून धरण्यात आली होती. परंतु विद्यापीठ प्रशासनाने याची दखल घेतली नसल्याने ३ सप्टेंबर रोजी विद्यापीठात विद्या परिषदेचे बैठक दरम्यान विद्यार्थी सेनेने विद्यापीठात ठिय्या आंदोलन सुरू केले. जोपर्यंत कॅरी ऑनचा प्रस्ताव मान्य होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय यावेळी विद्यार्थी सेनेने घेतला होता. या आंदोलनाची दखल घेत कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी विद्यार्थी सेनेची मागणी मान्य केली. तसेच विद्या परिषदेचे सदस्य प्रा. प्यारेलाल सूर्यवंशी यांच्याकडून हा प्रस्ताव विद्या परिषदेत ठेवून तो सर्वानुमते मान्य करण्यात आला.


दोन तासांनंतर स्वतः कुलगुरूंनी विद्या परिषदेमध्ये घेतलेला कॅरी ऑनचा निर्णय वाचून दाखवला. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला आहे. कॅरी ऑनमुळे अनुत्तरित विद्यार्थ्यांना सशर्त पुढल्या वर्षांमध्ये तत्काळ प्रवेश मिळणार आहे. यावेळी आंदोलनात युवासेना पश्चिम विदर्भ विभागीय सचिव सागर देशमुख, विद्यार्थी सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश सोळंके, उपजिल्हाप्रमुख इमरान सय्यद, हर्षद धोटे, शहरप्रमुख कार्तिक डकरे, भाविक कांबळे, योगेश डहाके, ऋषिकेश हिंगणकर, वेदांत दांडगे, आयुष कुरडकर, अनिकेत चावरे, साहिल ढोले, भूषण मेश्राम यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी होते.

# गाडगेनगरातील दोन कॅफेवर धाड, १२ प्रेमीयुगूल ताब्यात

## बेधुंद होऊन करित होते अश्लिल चाळे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती–** गाडगेनगर भागातील दोन कॅफेमध्ये युवक-युवती अश्लिल चाळे करित असल्याची गोपनीय माहिती मिळताच पोलिस आयुक्तालयातील भरोसा सेलच्या प्रमुख पीएसआय सुषमा आठवले यांनी दामिनी पथकासह दोन्ही -कॅफेवर धाड टाकून १२ प्रेमी युगूलांना अश्लिल चाळे करतांना रंगेहाथ ताब्यात घेतले. या कारवाईमुळे शहरात चांगलीच खळबळ उडाली होती. गाडगेनगर भागातील मुख्य मार्गावर असलेल्या एका कॉम्पलेक्समधील बैक बॅन्चर व द रॉयल कॅफेमध्ये प्रेमीयुगूल बंद कॅबीनमध्ये अश्लिल चाळे सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिस आयुक्तालयातील महिला सेलच्या प्रमुख पीआयदिप्ती ब्राम्हणे यांना मिळाली. त्यानुसार पीआय ब्राम्हणे यांनी भरोसा सेलच्या प्रमुख पीएसआय सुषमा आठवले यांना दामिनी पथका तेथे कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पीएसआय सुषमा आठवले यांनी तातडीने दामिनी पथकासह एकाचवेळी दोन्ही कॅफेवर धाड घालून १२ प्रेमीयुगूलांना ताब्यात घेतले. कॅफेच्या मालकांनी युगूलांना एकांतवास मिळावा म्हणून तेथे




कॅबीन तयार केले होते. अव्वाच्या सव्वा भाव आकारून तासाप्रमाणे युगूलांना कॅबीनदिले जायचे. १२ युवक वयुवतींना गाडगेनगर पोलिस ठाण्यात आणण्यात आले. यावेळी पोलिसांनी युवतींना त्यांच पालकांना ठाण्यात बोलावून त्यांच्या ताब्यात दिले. तर १२ युवकांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली. तसेच कॅफेच्या मालकांवर देखील गुन्हे दाखल केले. पोलिस आयुक्तालयच्या हद्दीत महिला, विद्यार्थीनी तसेच बालकांना कुठल्याही प्रकारे छेडछाड, चिडीमारी वइतर त्रासहोत असल्यास त्यांनीनिर्भय होऊन डायल ११२, नियंत्रण कक्षातील हेल्पलाईन १०९१, १०९८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलिस विभागातर्फे करण्यात आले आहे.

# वणीत विदर्भस्तरीय 'आझादी की दौड' संपन्न!

## सौरव,प्रणय,सलोनी, लावण्या प्रथम पुरस्काराचे मानकरी!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ मोर्शी –** येथील शिक्षण प्रसारक मंडळ व वणी लायन्स चॅरीटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित विदर्भस्तरीय 'आझादी की दौड ' स्पर्धेला विदर्भातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून पंधरा वर्षांवरील खुल्या गटातून पुरुष विभागात सौरव तिवारी (नागपूर) याने प्रथम क्रमांक तर महिला गटातून सलोनी लव्हाळे (भातकुली, अमरावती ) हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. दहा वर्षांवरील व पंधरा वर्षांआतील मुलांच्या गटात प्रणय उपासे (ब्रह्मपुरी) याने प्रथम क्रमांक तर मुलींच्या गटात लावण्या नागरकर(चंद्रपूर) हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे.या चारही धावपटूंना पाच हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि सोनेरी पदक सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.पंधरा वर्षांवरील खुल्या गटातून साईनाथ पुंगाटी (भामरागड) द्वितीय तर महिला गटातून अंजली मडावी ( नागपूर) हिचा द्वितीय क्रमांक आला.दहा वर्षांवरील व पंधरा वर्षांआतील मुलांच्या गटातपियुष गायधनी (चिमूर, चंद्रपूर)यांचा द्वितीय तर



### ९७४ स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग !

मुलींच्या गटात रुचिका नागरकर(चंद्रपूर) हिचा द्वितीय क्रमांक आला. या चारही धावपटूंना तीन हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, रुपेरी सन्मानपदक प्रदान करण्यात आले.पंधरा वर्षांवरील खुल्या गटातून पुरुष विभागात सनी फुसाटे (वर्धा) याने तृतीय तर महिला गटातूनअभिलाषा भगत (राजुरा ,चंद्रपूर) हिने तृतीय क्रमांक पटकावला.दहा वर्षांवरील व पंधरा वर्षांआतील मुलांच्या गटात अभय मस्की (नागपूर) याने तृतीय क्रमांक तर मुलींच्या गटात सेजल चौधरी ( वर्धा) हिने तृतीय क्रमांक पटकावला. या चारही धावपटूंना दोन हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, सन्मानपदक प्रदान करण्यात आले.या स्पर्धेत यवतमाळ, चंद्रपूर,नागपूर,अमरावती, गोंदिया भंडारा, वर्धा, बुलढाणा, गडचिरोली या जिल्ह्यांतील ९७४ धावपटू सहभागी झाले.सकाळी सात वाजता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजय मुकेवार यांचे अध्यक्षतेखाली वणीचे आमदार संजीवरेड्डी बोदकूरवार यांचे हस्ते आझादी की दौड स्पर्धेचे उद्घाटन झाले.स्पर्धेनंतर लगेच पारितोषिक वितरण समारंभ झाला.यावेळी वणीचे ठाणेदार अनिलकुमार बेहराणी, शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नरेंद्र बरडिया, सचिव सुभाष देशमुख सहसचिव अशोक सोनटक्के, कार्यकारिणी सदस्य उमापती कुचनकार, नरेंद्र ठाकरे, अनिल जयस्वाल,नरेश मुणोत,सुरेश शुक्ल,माजी आमदार विश्वास नांदेकर,लॉयन्स क्लबचे अध्यक्ष राजाभाऊ पाथ्रडकर,वणी लॉयन्स चॅरिटेबल ट्रस्टचे कोषाध्यक्ष चंद्रकांत जोबनपुत्रा, संचालक महेंद्र कुमार श्रीवास्तव, हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.सकाळी सात वाजता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजय मुकेवार यांचे अध्यक्षतेखाली वणीचे आमदार संजीवरेड्डी बोदकूरवार यांचे हस्ते आझादी की दौड स्पर्धेचे उद्घाटन झाले.स्पर्धेनंतर लगेच पारितोषिक वितरण समारंभ झाला. यावेळी लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रसाद खानझोडे ,स्पर्धेचे मुख्य संयोजक प्रा.उमेश व्यास, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ सुधाकर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.पुरुषोत्तम गोहोकार वणी लायन्स इंग्लिश मिडियम हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रशांत गोडे, वणी लायन्स वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य चित्रा देशपांडे, शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद क्षीरसागर, वाहतूक शाखा पोलिस निरीक्षक सीता वाघमारे,हे विचारपीठावर उपस्थित होते.सूत्रसंचालन डॉ. मनोज जंत्रे यांनी केले तर प्रशांत गोडे यांनी आभार मानले.या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी मुख्य संयोजक प्रा उमेश व्यास, क्रीडा शिक्षक प्रा.कमलेश बावणे, किरण बुजोणे ,रूपेश पिंपळकर, इंदु सिंग, यांचेसह लोकमान्य टिळक महाविद्यालय, शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालय,वणी लायन्स इंग्लिश मिडीयम हायस्कूल कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी संस्थांमधील सुमारे दोनशे पन्नास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , वाहतूक पोलीस, राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेल्या वीज ग्राहकासाठी महावितरणची अभय योजना

## लाभ घेतल्यास परिमंडळातील १ लाख ७८ हजार ग्राहकांचे होणार २२ कोटी ८४ लाख माफ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती–** वीज बिलाच्या थकबाकीमुळे कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेल्या परिमंडळातील घरगुती,व्यावसायिक आणि औद्योगिक वर्गवारीतील १ लाख ७७ हजार ८७३ ग्राहकांना महावितरण अभय योजना २०२४ मध्ये सहभागी होऊन थकबाकीमुक्त होण्याची संधी उपलब्ध झालेली आहे. थकबाकीदार ग्राहकांनी थकबाकीची मुद्दल रक्कम भरल्यास थकबाकीवरील व्याज आणि विलंब आकाराचे एकूण २२ कोटी ८४ लाख रुपये माफ होणार आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेच्या मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. तथापि, थेट कायदेशीर कारवाई करण्याच्या ऐवजी ग्राहकांना एक संधी म्हणून सवलतीची योजना लागू केली आहे.महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेशचंद्र यांनी मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार ग्राहकांना दिलासा देण्यासाठी १ सप्टेंबरपासून ही योजना राज्यात लागू करण्यात आली आहे. राज्यात ३१ मार्च २०२४ पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांसाठी ही योजना आहे. थकित बिलांच्या योजनेत कृषी ग्राहकांचा समावेश नाही.




योजनेचा कालावधी १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२४ आहे.

सहा हप्त्यात थकबाकी भरता येणार:

या योजनेत मुद्दल बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून ऊर्वरित ७० टक्के रक्कम सहा हफ्त्यात भरायची सोय आहे.

जे घरगुती, व्यावसायिक इत्यादी लघुदाब ग्राहक एक रकमी थकित बिल भरतील त्यांना दहा टक्के सवलत देण्यात येईल.

उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत मिळेल.

### असा लाभ घेता येणार

संबंधित वीज ग्राहकांना www.mahadiscom.in/wss/wss या वेबसाईटवरून ऑनलाईन पद्धतीने अभय योजनेचा लाभ घेता येईल. महावितरणच्या मोबाईल पवरून योजनेचा लाभ घेता येईल. वीज ग्राहक १९१२ किंवा १८००२३३३४३५ किंवा १८००२१२३४३५ या टोल फ्री क्रमांकावर फोन करूनही माहिती घेऊ शकतात. योजनेनुसार पैसे भरल्यानंतर संबंधित वीज ग्राहकाला पुन्हा एकदा नियमित वीज कनेक्शन घेता येईल. त्याच पत्त्यावर नियमानुसार कागदपत्रे सादर करून नव्या नावाने वीज कनेक्शन घेण्याचीही सुविधा असेल.

अमरावती परिमंडळाअंतर्गत कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित ग्राहकांची जिल्हानिहाय संख्या आणि त्यांच्याकडे असलेली थकबाकी व्याज आणि विलंब आकार

### अमरावती जिल्हा

पात्र ग्राहक संख्या – ७१४३१

मुळ थकबाकी – ५६ कोटी ८० लाख

व्याज आणि विलंब आकार– ११ कोटी

### यवतमाळ जिल्हा:

पात्र ग्राहक संख्या– १०६४४२

मुळ थकबाकी– ७७ कोटी ३१ लाख

व्याज आणि विलंब आकार – ११ कोटी ८४ लाख

# जिल्हा परिषदेला २०२४-२५ च्या आर्थिक वर्षात साधारणतः १५० कोटींचे नियतव्यय मंजूर

## प्रशासकीय मान्यतांसाठी धावपळ, मिनी मंत्रालय गर्दीने फुलले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती : –** विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लक्षात घेता राजकीय तसेच प्रशासकीय पातळीवरदेखील प्रशासकीय मान्यतांसाठी धावपळ सुरू झाली आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील जवळपास १५० कोटी रुपयांच्या नियोजनाची लगीनघाई सुरू झाली आहे.

विविध कामांच्या 'याद्या'च थेट टेबलावर धडकू लागल्या आहेत. त्यामुळे विधानसभा कधी लागेल ती लागेल, मात्र त्यापूर्वीच गावोगावी मंजूर कामांचे नारळ फोडून राजकीय फटाके फुटणार हे नक्की आहे. जिल्हा परिषदेला २०२४-२५ च्या आर्थिक वर्षात साधारणतः १५० कोटींचे नियतव्यय मंजूर आहे. यातून विकासकामांचे नियोजन केले जात आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या आचारसंहितेत कामे अडकू नयेत, यासाठी प्रशासनाकडूनही तत्परता दाखवली जात आहे. मात्र, जिल्हा परिषदेत सदस्य नसल्याने आता गट आणि गणातील कामांकडे दुर्लक्ष होत असल्याचा सूर आहे. जिल्हा परिषदेत पदाधिकारी, सदस्य असताना त्यांनी आपल्या गटातील आणि गणातील निकडीची कामे सुचवली जात होती, त्यानुसार प्रशासनानेही या कामांचा प्राधान्यक्रम तयार केला होता. मात्र, सध्या पदाधिकारी नाहीत. प्रशासक आहेत. त्यामुळे कुठली कामे होणार याची कल्पना नसल्याचा सूर माजी पदाधिकारी व सदस्यांमध्ये आहे. सध्या जिल्हा नियोजनच्या चालू वर्षीच्या बांधकाम विभागला ५० कोटींचे नियतव्यय आले आहे. याशिवाय शिक्षण, आरोग्य व



महिला बालकल्याण विभाग मिळून जवळपास १०० कोटी, त्यामुळे हा आकडा १५० कोटींपर्यत असू शकतो. यातून आचारसंहितेपूर्वी जास्तीत जास्त कामे मंजूर केली जाणार आहेत. यात ३०५४, ५०५४, आदींसह तीर्थक्षेत्र विकास, शाळाखोल्या बांधकाम, अंगणवाडी इमारत बांधकाम, प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम व अन्य कामांचा समावेश आहे. त्याअनुषंगाने कामे मंजुरीसाठी सर्वच मतदारसंघांतील विद्यमान आमदार आणि त्यांची यंत्रणा सक्रिय झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

सध्या जिल्हा परिषदेत पदाधिकारी, सदस्य नसल्याने विकासकामांच्या मंजुरीत सामान्य गावांना गरज असूनही कामे होऊ शकत नाही. प्रशासनाने स्वतः ग्राऊंडवर उतरून प्राधान्याने कामे मंजूर करायला हवीत, ज्यामुळे ग्रामीण भागातील निकडीची विकासकामे होऊ शकतात. यानुसार कामे होणे गरजेचे असल्याची प्रतिक्रिया जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बबलू देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

# पाणलोट क्षेत्रात जोरदार पावसाची शक्यता

## गतवर्षीच्या तुलनेत ४ टक्क्यांनी जलसाठ्यात वाढ
## अप्पर वर्धासह तीन सिंचन प्रकल्पांत 'ग्रीन अलर्ट'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

जिल्ह्यात अप्पर वर्धा या मोठ्या धरणासह चंद्रभागा, सपन, गर्गा या मध्यम प्रकल्पामध्ये ग्रीन अलर्ट दाखविण्यात आला असून या ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता वर्तविली जात आहे. जिल्ह्यात पावसाचा जोर कायम असल्याने अनेक लघु प्रकल्प ओहरफ्लो होऊन वाहत असल्याने प्रशासनाने त्या प्रकल्पाचे दारे उघडली आहे. गतवर्षी आजच्या दिवशी रोजी ७७.८५ टक्के पाणीसाठा होता. आजघडीला ५६ प्रकल्पांमध्ये ८१ टक्के जलसाठा आहे.

त्यामुळे जलपातळीत आणखी वाढ आहे. नदी-नाल्यांसह मोठे प्रकल्प आणि मध्यम प्रकल्पांच्या जलपातळी वाढली आहे. सद्यस्थितीत ५६ प्रकल्पांत उपयुक्त जलसाठा ८१ टक्के आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या



अप्पर वर्धा धरणाचा पाणीसाठा हा ९०.६८ टक्क्यांवर पोहोचला आहे. ७ मध्यम प्रकल्पांत ६४.७४ टक्के पाणीसाठा तर ४८ लघु प्रकल्पांत ७५.५० टक्क्यांवर जलसाठा आहे. यातील अनेक मध्यम आणि लघु प्रकल्प ओव्हरफ्लो झाले आहेत. त्यापैकी यातील सात प्रकल्पांची दारे उघडण्यात आली आहे

जिल्ह्यात यंदा होत असलेल्या संततधार पावसामुळे प्रकल्पातील पाणीसाठा कमालीचा वाढत आहे. जिल्ह्यात तीन ते चार दिवसांपासून पावसाची रिपरिप सुरू आहे.यामध्ये सर्वांत मोठा अप्पर वर्धा धरण ९० टक्क्यांवर भरले आहेत. याचे ५ गेट ४० सेंटी मीटरने खुले करण्यात आली आहे. तर मध्यम प्रकल्प ल्प असलेल्या शहानूरचे ४ गेट १० सेंटी मीटरने खुले करण्यात आले आहे. त्यातून ३२.६५ क्यूमेक विसर्ग होत आहे. तसेच चंद्रभागा प्रकल्पाचे ३ गेट १० सेंमी उघडले असून यातून ३४.६३ क्यूमेक विसर्ग होत आहे. तर पूर्णाचे ३ गेट १० सेंमी खुले केली असून २४.६३ ववूमेका विसर्ग होत आहे.सपनचे २ दारे ५ सेंटी मीटरने उघडी केली असून ७.४४ क्यूमेकने विसर्ग होत आहे. तर पंडरी प्रकल्पातून ५.६७५२ क्यूमेकने विसर्ग होत आहे. तर गर्गामधून देखील पाण्याचा नियमित विसर्ग होत आहे. जिल्ह्यातील अप्पर वर्धा, चंद्रभागा, सपन, गर्गा या चरणामध्ये ग्रीन अलर्ट दाखविण्यात आला आहे. रविवारी जिल्ह्यात १८ मोमि पावसाची नोंद झाली आहे. यात चिखलदरा तालुक्यात ५२ टक्के पाऊस बरसला आहे. आतापर्यंत सरासरी १६ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

# अतिपावसमुळे पिकांच्या उत्पादनाची सरासरी घटण्याची शक्यता

## सोयाबीन,कापूस, तुरीवर किडीचे आक्रमण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

जुलैनंतर ऑगस्टमध्ये सतत बरसलेल्या पावसामुळे सोयाबीनसह कापूस व तुरीवर कीडरोगांचे आक्रमण झाले आहे. सोयाबीनवर अधिक प्रादुर्भाव असून कपाशीची वाढ खुंटली आहे. तसेच तुरीवर मर रोग आल्याचे दिसून आले आहे. यामुळे या खरीप हंगामात उत्पादनाची सरासरी घटण्याची शक्यता कृषी विभागाने वर्तविली आहे.

जून ते ऑगस्ट या कालावधीत जिल्ह्यात ६८० मिमी पाऊस अपेक्षित असताना तो ६५७ मिमी झाला आहे. सरासरीने तो ९६ टक्के असून ऑगस्टमधील सत्तच्या पावसाने खरिपातील पिकांना धोका निर्माण झाला आहे. जिल्ह्यात २ लाख ६४ हजार ८४० हेक्टर क्षेत्रात सोयाबीनची पेरणी झाली आहे. तिवस्य, नांदगाव खंडेश्वर, दर्यापूर, भातकुली, धारणी, चांदूरबाजार व चांदूर रेल्वे या तालुक्यात सततच्या पावसाने भारी जमिनीतील सोयाबीन पिवळे पडू लागले आहे. तसेच काही ठिकाणी सोयाबीनवर भुंगा, उंटअळी व स्पोडोप्टेरा अळीचा प्रादुर्भाव झाला आहे. ऐन वाढोच्या कालावधीत कोडोंचे आक्रमण झाल्याने याचा एकुणच परिणाम सोयायौनच्या उत्पादनावर होण्याची शक्यता वाढली आहे. सोयाबीन पाठोपाठ खरिपातील महत्त्वाचे व नगदी पीक असलेल्या कापसाची वाढ अतिपावसाने खुंटलेआहे. जिल्ह्यात २ लाख ३६ हजार ६४७ हेक्टर क्षेत्रात कपाशीची लागवड आहे. यातील बऱ्याच ठिकाणी अल्प प्रमाणात तुडतुडे व फूल किड्यांचा प्रादुर्भाव झाला आहे. तूर पिकावर मर रोगाचे आक्रमण झाले आहे. १ लाख १७ हजार ९९६ हेक्टरमध्ये यंदा तुरीची पेरणी आहे. सततच्या पावसाने काही क्षेत्रात पावसाचे पाणी साचल्याने कौडरोग वाढले आहेत. कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना रोगप्रतिबंधक उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत, क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत उपाययोजनांचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात येत आहे.



### मूग व उडदाची स्थिती नाजूक

यंदा मूग व उडदाची पेरणी अतिशय कमी प्रमाणात आहे. १०८२ हेक्टरमध्ये मूग व ६७८ हेक्टरमध्ये उडदाची पेरणी आहे. दोन्ही पिकांच्या शेंगा भरण्याच्या अवस्थेत असून त्यावर मावा किडींचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे या पिकांच्या उत्पादनावर विपरित परिणामाची शक्यता कृषी विभागाने वर्तविली आहे.

# अंजनगाव सुर्जीची पिवळी मारबत ठरली आकर्षणाचा केंद्रबिंदू

## दीडशे वर्षांची परंपरा आजही उत्साहात : नागपूर नंतर येथील कोष्टी समाजाचा मानाचा उत्सव : इडा पिडा घेऊन जाय गे मारबत च्या घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अंजनगाव सुर्जी**

पुरातन काळात अध्यात्मिक संस्कृतीतील महत्त्वाचा उत्सव मानल्या जाणाऱ्या मारबत पूजनाच्या उत्सव शहरातील कोष्टी समाजाच्या वतीने आज दीडशे वर्षानंतरही तितक्याच भक्तिभावाने साजरा केल्या जात असून तिसऱ्या चौथ्या पिढीतील युवक दरवर्षी या पिवळ्या मारबत मिरवणुकीचे आयोजन करते त्यात इतर समाजातील युवकांचा सुद्धा सहभाग असतो हा उत्सव साजरा करण्यात विदर्भात नागपूर नंतर अंजनगावसुर्जीचे नाव घेतल्या जातेआजच्या प्रगत विज्ञान युगात प्रत्येकाला प्रगतीचे पंख मिळाले असले तरी पुरातन काळाच्या आठवणी आजही जपल्या जातात त्या काळात संकटाचा सामना करण्यासाठी अध्यात्माची साथ मिळवली जायची आणि त्यातून समाधान अनुभवल्या जात होते यातूनच मारबत पूजनाचा उत्सव सुरू झाल्याचे सांगितल्या जाते त्या काळात शारीरिक, आर्थिक,सामाजिक व नैसर्गिक संकट घालवण्यासाठी इडा पिडा घेऊन जाय गे मारबतया भावनेतून मिरवणूक काढून मारबत पूजन



करण्याची पुरातन परंपरा आजही शहरात सुमारे दीडशे वर्षानंतर अविरत सुरू आहे दरवर्षी पोळ्याच्या दुऱ्या दिवशी येथील गुलजारपुरा भागातील हनुमान मंदीरात कोष्टी समाजातील युवक मोठ्या भक्तिभावाने पोळ्याचा सण आटोपताच रात्री पिवळ्या मारबत मूर्तीचे निर्माण करतात व दुसऱ्या दिवशी करीदिनी ट्रॅक्टर ट्रॉली वर या मारबत ला विराजमान करून ढोल ताशांच्या गजरात शहरातून मिरवणूक काढल्या जाते यावेळी इडा पिडा घेऊन जाय गे मारबत या घोषणा दिल्या जातात आणि शहरात ठिकठिकाणी या मारबत चे नागरिकांच्या वतीने पूजन केल्या जाते व नंतर मूर्तीचे विसर्जन केल्या जाते दरवर्षी शहरवासी या मारबत मिरवणुकीची आतुरतेने वाट पाहत असतात कोष्टी साजाजातील युवकांना या उत्सवासाठी इतर समाजाच्या वतीने सुद्धा सहकार्य लाभते यावर्षी मंगळवारी (ता.०३) पिवळ्या मारबत ची वाजत गाजत मिरवणूक शहरातून निघाली यासाठी गुलजारपुरा भागातील राहुल पाटील, नागेश पाटील, सचिन गारोडेकर, दिपक मातीरे ,सागर लहाड, नितीन परांडे, , हर्षल गुजर, शुभम होरे, अक्षय लहाड,कैलास माहोरे अक्षय गुजर, आकाश होरे, गणेश ढोरे, सचिन गोखे, पंकज गुजर, कपिल माहोरे, वेदांत भुजाडे, सुधीर तायडे, गजू पाटील, बंटी माहोरे, मनीष मेण, मुकेश गुजर, प्रथमेश टेवरे, राहुल माहोरे नितिन भुजाडे यांनी परिश्रम घेतले तर हनुमान देवस्थान चे विश्वस्त व समाजातील ज्येष्ठ नागरिकांचे या युवकांना मार्गदर्शन लाभले.

# शहरातील २४ 'क' वर्ग तीर्थक्षेत्र मंजुरीच्या प्रतीक्षेत

## मनपाकडे रखडले प्रस्ताव : पंकज मेश्राम यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक, श्रीकृष्ण मंदिर, माताखिडकी, श्री. बालाजी मंदिर, मद्रासीवाबा दर्गा, कमलीवाले बाबा दर्गा, श्री. हनुमान देवस्थान, गढीचा मारुती, इंद्रशेषवावा दरवार, श्रीक्षेत्रकालीमाता मंदिर, श्रीक्षेत्र अंबादेवी संस्थान, एकवीरा देवी संस्थान, भीमटेकडी, सैतवाल दिगंबर जैन मंदिर, काव्य मारोती देवस्थान, गाडगेचाया समाधी मंदिर, साईचाचा मंदिर, साईनगर, श्रीक्षेत्र गंभीरशेष संस्थान बहाळी, श्रीदत्त क्षेत्र कुंभारवाडा है २४ धार्मिक स्थळ 'क' तीर्थक्षेत्राच्या प्रतीक्षेत आहे. सन २००८ ते २०२३ पर्यंतचे क वर्ग तीर्थक्षेत्र मंजूरी प्रस्ताव राज्याच्या नगर विकास विभागाकडे महानगरपालिका प्रशासनाने अद्यापपर्यंत जिल्हाधिकाऱ्याच्या मार्फत सादर केलेले नाही.राज्यातील अनेक तीर्थक्षेत्रांच्या यात्रा स्थळांच्या ठिकाणी भेट देणाऱ्या यात्रेकरूंची संख्या फार मोठ्या प्रमाणात असते. बऱ्याच तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी वर्षामधील काही ठराविक कालावधीमध्ये मोठ्या संख्येने यात्रेकरू भेट देतात, अशी



तीर्थस्थाने यात्रास्थळे या स्थानिक नागरिक संस्थानच्या क्षेत्रात आहेत. त्यांना अशा मोठ्या संख्येने येणाऱ्या यात्रेकरूंना पुरेशा प्रमाणात मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करणे साधन संपत्तीच्या मरिमुळे अडचणीचे होते. पर्यायाने यात्रेकरूना गैरसोय सोसावी लागते. या परिस्थितीचा विचार करून प्रमुख तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी आवश्यक मुलभूत सोई पुरविण्यासाठी व त्या अनुषंगाने आवश्यक विकासाची कामे नागरी स्थानिक संस्थानच्या हद्दीत येणाऱ्या तीर्थक्षेत्रांच्या बाबतीत राज्य शासनाने आता २१ योजना मंजूर केलेल्या आहेत. क श्रेणी तीर्थक्षेत्र म्हणजे जिल्हा स्तरावर स्थानिक महत्व असलेली ठिकाणे जिल्हा नियोजन व विकास समितीने उपलब्ध केलेल्या तरतुदीमधून विकसित करण्यात येतात.

अश्यातच अमरावती शहरात २४ धार्मिक स्थळ आहेत की, जी क तीर्थक्षेत्राच्या प्रतीक्षेत आहे. मात्र, याकडे लोकप्रतिनिधीसह प्रशासनाने दुर्लक्ष असल्याचा आरोप भीमशक्ती संघटनेचे विदर्भ अध्यक्ष पंकज मेश्राम यांनी केला असून गाथावत या सर्व धार्मिकस्थळांचा विकास व्हावा व मनपा प्रशासनाने सदरचे प्रस्ताव तत्काळ सादर करावे, अशी मागणी मुख्यमंत्री, पालकमंत्री, जिल्हाधिकारी याच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांच्या संपस्थळी गुणवंत देवपारे यांची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

एसटी कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी संप पुकारला आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या संपस्थळी गुणवंत देवपारे यांनी भेट देऊन त्यांच्याशी चर्चा केली.

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी



कामगारांना वेतन देण्यात यावे, महागाई भत्त्याची थकबाकी देण्यात यावी, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे घर भाडे भत्ता व वार्षिक वेतन वाढीचा दर कर्मचाऱ्यांना लागू करावा, सेवा कालावधीनुसार मूळ वेतनात वाढ करावी, सध्या लागू असलेल्या वैद्यकीय खर्चाच्या योजनेऐवजी कॅशलेस योजना एसटी कामगारांना लागू करावी, एसटी कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना सर्व प्रकारच्या बसमध्ये मोफत पासची सवलत देण्यात यावी, यासह अन्य मागण्यांसाठी हा संप पुकारण्यात आला आहे. या संपस्थळी गुणवंत देवपारे यांनी भेट देत कर्मचाऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या, कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी आम्हीसुद्धा पाठपुरावा करू, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ४० हजारांची मदत द्या

## प्रीतीताई बंड यांच्या नेतृत्वात शिवसेनेची विभागीय आयुक्त कार्यालयात धडक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे शेती पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. महागडी बि-बियाणे खरेदी करून शेतात पेरणी केली. परंतु सततच्या पावसामुळे शेतकर्यांच्या हातात काही येईल, असे दिसत नाही. त्यामुळे नुकसानग्रस्त शेती पिकाचे तातडीने पंचनामे करून शेतकर्यांना हेक्टरी ४० हजार रूपयांची मदत सरकारने द्यावी, यामागणीसाठी शिवसेना नेत्या प्रीतीताई बंड यांच्या नेतृत्वात शिवसेनेने विभागीय आयुक्त कार्यालयात गुरूवारी (दि. ५) धडक दिली. यावेळी आपल्या मागण्यांचे निवेदन विभागीय आयुक्तांना दिले.

शेतात पीक पेरणी झाल्यानंतर दोन



महिन्यांपासून सतत पाऊस सुरू आहे. पीक उभे झाल्यानंतर शेतात निंदन, खुरपण, फवारणी करण्याची उसंत पावसाने दिली नाही. काही भागात शेतात पावसामुळे तलाव साचले. सोयाबीन पीक पिवळे पडले आहे. हातचा पैसा गेल्यानंतरही उत्पन्न होणार नसल्याने शेतकरी मेटाकुटीस आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेती पिकाचे तातडीने पंचनामे करून शेतकर्यांना हेक्टरी ४० हजार रूपयांची मदत देण्याची मागणी शिवसेनेच्यावतीने करण्यात आली. शेतकर्यांना तातडीने मदत न मिळाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा शिवसेनेच्यावतीने निवेदनातून दिला आहे.

निवेदन देताना शिवसेना (उबाठा) महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख प्रीतीताई बंड, सहसंपर्क प्रमुख नाना नागमोते, भातकुली तालुकाप्रमुख मनोहर बुध, उपतालुका प्रमुख उमेश घुरडे, उपजिल्हाप्रमुख प्रवीण अळसपुरे, श्रीनिवास सरडे, विश्वास वानखडे, रवी काळबांडे, संजय विघे, रघुनाथराव वानखडे, पांडुरंग बगाडे, विजय कडू यांच्यासह अनेक शिवसैनिकांची उपस्थिती होती.

# सततच्या पावसाने पिकाचे नुकसान झाले त्यांना नुकसान भरपाई द्या : तुषार भारतीय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५ भातकुली**

गेल्या दोन महिन्यांपासून सतत च्या होणाऱ्या पावसामुळे शेतातील पिक खराब होत चालले असून शेतजमिनीत आता पाण्याचा निचरा होत नसल्याने शेतात पाणी साचले आहे.भातकुली तालुक्यातील शेतजमीन खरपान पट्टा असल्याने या भागात कमी पाण्याने पीक येत असल्याने या भागातील ५० टक्के पीक हातून गेले असून उर्वरित पिकाचे उत्पन्न हे निम्म्यापेक्षा कमी झाले आहे,



तसेच दोन दिवसापूर्वी आलेल्या पावसाने नाल्याला पूर येऊन गेला त्या मध्ये हरतोटी,हातूर्ण या भागात शेती खरडून निघाली या दोन्ही कारणाने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.राज्य सरकारने सतत च्या पावसामुळे झालेल्या पिकाच्या नुकसान भरपाई च्या [illegible] चा आधार घेऊन पंचनामे करुन राज्यशासनांकडे प्रस्ताव पाठवावे या बाबत भातकुली तालुक्यातील तहसीलदार श्री येळे साहेबांशी भाजपा नेते



तुषार भारतीय यांनी चर्चा केली. सोबत इतर विषयावर चर्चा केली या वेळी भातकुली भाजपा सरचिटणीस योगेश उघडे,सचिव गोपाल भरणे भाजपा नेते श्री गजानन लेंडे,दिनेश खेडकर, अतुल नाचणकर,श्री गजानन चुणकीकर, उपस्थित होते.

# भाकप फुंकणार जातनिहाय जनगणनेच्या मागणीचे रणशिंग

## उद्याला कोल्हापुरात राज्यव्यापी परिषद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

देशात जातनिहाय जनगणना करावी या मागणीसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष अनेक वर्षापासून आग्रही आहे. भाकपने २०१७ साली राज्यसभेत याबाबतचे खाजगी विधेयक ही मांडले होते. आरक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी देशात जातनिहाय जनगणना व्हावी आणि आरक्षणाची ५०% मर्यादेची अट उठवावी या मागणीसाठी पक्षाने देशभरात मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत राजश्री छत्रपती शाहू महाराजांच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्षाच्या निमित्ताने भारतीय कम्युनिस्ट पक्षाने राजश्री शाहू महाराजांच्या भूमीत कोल्हापूरला उद्या सहा सप्टेंबरला राज्यव्यापी परिषद आयोजित केली आहे .या परिषदेच्या माध्यमातून जातनिहाय जनगणना मागणीच्या लढ्याचे रणशिंग फुंकणार आहे.



कोल्हापुरातील दसरा चौकातील शाहू महाराज स्मारक भवन येथे आयोजित या राज्यव्यापी जातनिहाय जनगणना समर्थन परिषदेचे उद्घाटन कोल्हापूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार शाहू छत्रपती यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी सावित्रीबाई फुले विद्यापीठातील प्रा. डॉ. संजय कांबळे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय सचिव डॉ .भालचंद्र कानगो अध्यक्षस्थान भूषवणार आहे .या परिषदेला शुभेच्छा देण्यासाठी महाविकास आघाडीच्या सर्व प्रमुख नेत्यांना निमंत्रित करण्यात आले असून या राज्य परिषदेची जोरदार तयारी भाकपचे कार्यकर्ते करीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारकडून भारत हा आर्थिक महासत्ता बनत असल्याचा सातत्याने दावा केला जात असतानाच वेगवेगळ्या जाती-धर्मातील बेरोजगार तरुण मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून आंदोलन करताना दिसत आहेत. भारतीय समाज हा जात वर्गीय असल्याने बहुसंख्य तरुण मागास राहण्याचे कारण आर्थिक तसेच सामाजिक देखील आहे जातीय विषमतेने बहुसंख्य समूहाच्या आर्थिक विकासाच्या संधी हिरावून घेतल्याचे स्पष्ट दिसते म्हणूनच अशा मोठ्या संख्येने मागास राहिलेल्या समूहाच्या सार्वजनिक आर्थिक मागासलेपणाचे मापन करण्यासाठी जातनिहाय जनगणना हे सर्वोत्तम साधन आहे .२०११ साली देशात जनगणना झाली .मात्र २०२१ ची जनगणना अद्यापही या सरकारने सुरू केलेली नाही. ही जनगणना तातडीने हाती घ्यावी व ती करताना जातनिहाय जनगणना करावी अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाने सातत्याने केली आहे . किंबहुना भारतीय कम्युनिस्ट पक्षाने २०१७ साली राज्यसभेत जात निहाय जनगणना करावी .यासाठी खाजगी विधेयक मांडून ही मागणी आग्रहाने लावून धरलेली आहे. तसेच आपल्या लोकसभा निवडणूक जाहीरनाम्यात याचा उल्लेख केला आहे .तसेच आरक्षणाची मर्यादा ५० टक्के पेक्षा जास्त नसावी .हे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश अन्यायकारक असून केंद्र शासनाने ५०% ची ही अट उठवणे आवश्यक आहे .असे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे मत आहे या दोन्ही मागण्यांसाठी पक्षाने देशभरात मोहीम सुरू केली असून महाराष्ट्रात ऑगस्ट महिन्यात प्रत्येक जिल्ह्यात अशा जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय परिषदा पार पडलेल्या आहेत. त्याद्वारे जनजागृतीचे कार्य केले आहे. तसेच १८ जुलैला राज्यात एकाच वेळी २६ जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करून या मागणीचे निवेदन शासनाला दिले आहे. आणि ३० ऑगस्टला प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर भाकपच्यावतीने जातनिहाय जनगणनेसाठी राज्यभर आंदोलन केले.राज्यभरात या मागणीला मिळालेल्या वाढत्या प्रतिसादा नंतर आत्ता आज कोल्हापूर येथे राज्यव्यापी समर्थन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेमध्ये राज्यभरातून शेकडो कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेततसेच या मागणीला समर्थन देणाऱ्या विचारवंत , विविधसंघटना व राजकीय पक्षांना आमंत्रित करण्यात आले आहे. आवाहन पण करण्यात आहे. सदर माहिती भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कार्यकारणी सदस्य कॉ.अशोक सोनारकर व जिल्हा सचिव का.सुनील मेटकर यांनी दिली आहे.

# रेशन कार्ड हरवले, तर मिळणार ई-रेशन कार्ड

## अडचण दूर होणार : ई-रेशनकार्डसाठी नवी प्रणाली जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

सरकारी स्वस्त धान्यासाठी तयार केलेले रेशन कार्ड हरवल्यास आता शासनाकडून कडून ई- रेशन कार्ड उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी शासनाने एक नवी प्रणाली तयार केली. या प्रणालीचा वापर करून प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून ई- रेशन कार्ड तयार करता येते, अशी माहिती पुरवठा विभागाकडून देण्यात आली.

केंद्र व राज्य सरकारकडून सुरू करण्यात आलेल्या रेशन कार्ड योजनेचा फायदा कित्येक गरीब कुटुंबीयांना होत आहे. आता जुने रेशन कार्ड हरवल्यास त्या जागी ई-रेशन कार्ड सुरू करण्यात आले. त्यामुळे आता लाभार्थ्यांना ई- रेशन कार्डद्वारे धान्य खरेदी करता येणार आहे. ई- रेशन कार्डमले कार्डमधील नाव कमीकरणे, नोंदवणे, ट्रान्सफर करणे, अशी कामे करण्यासही मदत होणार आहे. राज्यात ई- रेशन कार्ड प्रणाली सुरू करण्यात आली. पुढील काही महिन्यांत टप्याटप्याने सर्व रेशन कार्ड ई- कार्डमध्ये रूपांतरित करण्याची तयारी झाली. यासाठी संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली.पुरवठा विभागात प्रायोगिक स्तरावर या प्रणालीचा वापर सुरू झाला आहे.




### ई- रेशन कार्ड कोणाला मिळणार

शिधापत्रिका हरवल्यास डुप्लिकेट शिधापत्रिका बनवण्यासाठी एक ऑनलाइन अर्ज भरावा लागेल. रेशन दुकान किंवा अन्न विभाग कार्यालय किंवा किओस्क सेंटरमधून अर्ज मिळेल. दिलेल्या लिंकवरून डुप्लिकेट रेशन कार्ड ऑनलाइन बनवण्यासाठी अर्ज डाउनलोड करू शकता. रेशन कार्ड डुप्लिकेट फॉर्म पीडीएफ हा फॉर्म फूड सेफ्टी पोर्टलवर मिळवू शकता. अर्ज प्राप्त केल्यानंतर, तो अर्ज काळजीपूर्वक भरा. रेशन कार्ड क्रमांक, शिधापत्रिकेत नोंद केलेले कुटुंबप्रमुखाचे नाव, वडील व आईचे नाव, मोबाइल नंबर इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी.

### रेशन कार्ड हरवले तर करा ऑनलाइन अर्ज

यापूर्वी जुन्या रेशन कार्डबाबत अनेक तक्रारी निर्माण झाल्या होत्या. जुने रेशन कार्ड असल्यामुळे ते मळकट होणे, हरवणे, फाटणे, त्यावरील नावे पुसून जाणे, अशा कित्येक गोष्टी रेशनधारकांना अडचणीच्या ठरत होत्या. या सर्व गोष्टींवर उपाय म्हणून तसेच सर्व प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने नोंद घ्यावी यासाठी ई-रेशन कार्ड प्रणाली सुरू झाली आहे. याचा फायदा नागरिकांना होणार आहे.

# पांढुर्ण्याच्या गोटमार यात्रेत ६०० जखमी, आठ गंभीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ वरूड**

येथून ३५ कि.मी.वर असलेल्या मध्य प्रदेशातील सावरगाव आणि पांढुर्ण्याच्या भाविकांमध्ये जांब नदीतील झेंडा बळकावण्याची प्रसिद्ध गोटमार यात्रा मंगळवारी पार पडली. सकाळी सहा वाजता गोटमारीला सुरुवात झाली. सायंकाळी सात वाजता पांढुर्णा आणि सावरगावच्या भाविकांनी दोन्ही पक्षांच्या सहमतीने पळसाचा झेंडा काढून विधीवत पांढुर्ण्याच्या भाविकांकडे सोपवला. झेंडा बळकावण्याच्या चढाओढीत दगडांच्या माराने ६०० हून अधिक भाविक जखमी झाले.



प्रशासनाने विरोध केला तरी ही गोटमार श्रावणी अमावास्येला पूर्वापार सुरू आहे. प्रशासनाच्या वतीने पांढुर्णा जिल्हाधिकारी अजयदेव शर्मा, पोलिस अधीक्षक सुंदरसिंह कनेश यांच्या उपस्थितीत महसूल आणि पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला.

**काय आहे आख्यायिका**

प्रेमीयुगुलांच्या आख्यायिकेच्या आधारावर दोन गावांना विलग करणाऱ्या जांब नदीपात्रात रोवलेला पळसाच्या झाडावरील झेंडा काढण्याकरिता भाविकांमध्ये चढाओढ होते.

भाविकांचे श्रद्धास्थान चंडी मातेच्या मंदिरात झेंडा नेला जातो. यामध्ये पांढुर्णा आणि सावरगावचे भाविक सहभागी होऊन झेंडा काढण्यास गेल्यावर दगडफेक करतात. गोटमारीमुळे ७६ वर्षांत हजारो लोकांना अपंगत्व आले, १४ लोकांनी प्राण गमावले.

# गणपती उत्सवात पुण्याला जायचंय? ट्रॅव्हल्सचे तिकीट दोन ते तीन हजार रुपये

## आरक्षणच मिळेना : वेळेवर तिकीट न काढल्यास जादा रक्कम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

जिल्ह्यातून पुणे शहरात जाणाऱ्यांची संख्या वाढली. शिक्षण व उद्योग, व्यवसायाच्या निमित्ताने प्रवासी वाढत असूनही नियमित रेल्वे नाही. आता तर गणेशोत्सव सुरू होत आहे. या उत्सवादरम्यान चंद्रपुरातून पुण्याला जायचे असेल तर ट्रॅव्हल्ससाठी ३ हजारांचे तिकीट काढावे लागत आहे. त्यातही वेळेवर तिकीट न काढल्यास जादा रक्कम मोजण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे.



गणेशोत्सव आता अगदी काही दिवसांवर आला आहे. या कालावधीत चंद्रपूर जिल्ह्यात नोकरी करणारे आपल्या मूळ गावाला जाण्याची तयारी करू लागले आहेत. मुंबई व पुणे या मार्गावर खासगी प्रवासी ट्रॅव्हल्स सेवा पुरवत असतात. याच कालावधीत गर्दीचा हंगाम लक्षात घेत खासगीट्रॅव्हल्स व्यावसायिकांकडून अवास्तव तिकिटाचे दर आकारले जातात. नागपूर मार्ग अमरावती वरून दररोज पुण्याला ३० ते ४० ट्रॅव्हल्स जातात. पुण्याला जाण्यासाठीदोन रेल्वे आहेत मात्र त्याची वेळ ही प्रवाश्यांच्या सोयीची नाही जिल्ह्यातील हजारो उच्चशिक्षण विद्यार्थी पुणे-मुंबईत घेतात. उद्योग अनेक व्यापारी व्यवसायातील पुण्याला जातात. पण, रेल्वेअभावी त्यांना खासगी ट्रॅव्हल्सवर अवलंबून राहावे लागते. पुण्याकडे गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो. या दिवसांत चाकरमानी आपल्या गावाकडे जातात. त्यामुळे सर्व खासगी ट्रॅव्हल्स आधीच आरक्षित झाल्या आहेत.

### दिवाळी- गणपतीमध्ये ट्रॅव्हल्सची कमाई

अमरावती मधून हैदराबाद, पुणे, छत्रपती संभाजीनगर येथे - जाणारे खासगी ट्रॅव्हल्स वाढले. सण-उत्सव नसताना काही - ट्रॅव्हल्स मालकांना प्रवाशीच मिळत नाहीत. परिणामी, वाहतुकीचा खर्च निघणे - कठीण होते. दिवाळी व ५ गणेशोत्सवात प्रवासी वाढतात. या कालावधीतच ट्रॅव्हल्सची कमाई होते, अशी माहिती एका ट्रॅव्हल्स मालकाने दिली.

### दरवाढीवर नियंत्रण कोणाचे ?

राज्य परिवहन महामंडळाच्या राज्य परिवहन प्राधिकरणाने दरपत्रक ठरवून दिले आहे. कोणत्याही खासगी बस वाहतू-कदाराने या दराच्या ५० टक्के अधिक (दीडपट) आकारणी करण्यास परवानगी असून, या दराच्या दीडपटीपेक्षा जास्त भाडे आकारता येत नाही. असे झाल्यास प्रवाशांनी वाहनाचा नोंदणी क्रमांक व भाडे आकारणी तिकीट यांच्या फोटोसह तक्रार नोंदवावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन विभागाने केले.

# आदिवासी विद्यार्थ्यांना मिळणार गोंडी-कोलामी बोलीभाषेतून शिक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागात आदिवासी बहुलकोलामी व गोंडी बोलीचा वापर दैनंदिन व्यवहारात होतो. मात्र, तेथील विद्यार्थ्यांना मराठीतून शिक्षण दिले जाते. शैक्षणिक भाषेचा विरोधाभास व मातृभाषेतील बालवाचन पुस्तकांअभावी प्रगतीत अडथळे निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर आदिवासी विकास विभागाने पहिली ते चौथीच्या क्रमिक पुस्तकांचे स्थानिक बोली भाषांत भाषांतरित करण्याचा निर्णय घेतला. टप्प्याटप्प्याने ही पुस्तके उपलब्ध होणार असल्याने जिल्ह्यातील गोंडी व कोलामी विद्यार्थ्यांना त्यांच्या बोलीभाषेत शिक्षण मिळणार आहे.



आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांच्या बोलीभाषेत शिक्षण मिळावे, यासाठी केंद्रीय जनजाती कार्य मंत्रालयाच्या निर्देशानुसार इयत्ता पहिली ते चौथीच्या मराठी बालभारती क्रमिक पाठ्यपुस्तकांचे कोरकू, गोंडी, भिल, माथवाडी, मावची माडिया, कोलामी, भिल बसावे, भिल-भिलावू वारलीकोकणा, कोकणी, पावरी व कातकरी या बोलीभाषेत अनुवाद सुरू आहे. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात 'टीआरटीआय'ने त्यांच्याकडे असलेल्या बालभारतीच्या क्रमिक = पुस्तकांचे भाषांतर करून शासकीय - आश्रमशाळांसाठी उपलब्ध करून - दिले. त्याद्वारे आदिवासी बहुल भागातील इयत्ता पहिली ते आठवीच्याविद्यार्थी व शिक्षकांना बोलीभाषेतून प्रमाण भाषेकडे नेले जाणार आहे. या पुस्तकांचे वितरण आश्रमशाळा स्तरावर सुरू आहे. उर्वरित पाठ्यपुस्तके लवकरच प्राप्त होतील. त्यांनतर पुस्तकांचे आश्रमशाळा स्तरावर वितरण केले जाईल, अशी माहिती आदिवासी विकास विभागाने दिली.

# जिल्ह्यातील नुकसानीचे तत्काळ होणार पंचनामे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

मुसळधार पावसामुळे नुकसान झालेल्या जिल्ह्यातील नुकसानीचे पंचनामे आणि मदतीची कार्यवाही तत्काळ सुरू करावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. त्यानुसार जिल्हा प्रशासनाकडून पंचनाम्याचे काम सुरु करण्यात आले आहे. पिकांचे झालेले नुकसान, घरांची पडझड, पशुधनाची हानी अशा सर्व बाबींची माहिती घेण्यात यावी, यासंदर्भात त्वरित पंचनामे करण्यात यावेत.

### जिल्हा प्रशासन लागले कामाला

अतिवृष्टीमुळे तात्पुरते स्थलांतर केलेल्या लोकांना सर्व आवश्यक सुविधा देण्यात याव्यात. त्यांना आवश्यक ती सर्व मदत त्वरित उपलब्ध करून द्यावी. जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, स्थानिक महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायती,पोलिस प्रशासन आदी सर्वांनी समन्वयाने यासाठी कामकाज करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास खुला ठेवावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले. पाटबंधारे विभाग, हवामान खाते यांच्याशी समन्वय ठेवून लोकांना आवश्यक माहिती द्यावी. लोकांच्या मदतीसाठी आपत्कालीन हेल्पलाइन व कंट्रोल रूम त्वरित कार्यरत करावी. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडव्यावत,विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता शाळा व महाविद्यालयासंदर्भात स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने निर्णय घ्यावा, झालेल्या नुकसानीची माहिती इत्यादी माहिती त्वरित वेळोवेळी सादर करावी, अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या आहेत.

# फेटा, पितांबर नेसलेल्या स्टोनवर्कवाल्या बाप्पाची भुरळ

## लगबग गणेशोत्सवाची सजावटीच्या गणेशमूर्तींची आतापासूनच होतेय बुकिंग



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

यंदाचा गणेशोत्सव जेमतेम दोन दिवसांवर येऊन ठेपला असल्याने सर्व गणेशभक्तांना बाप्पाच्या आगमनाची आतुरता लागली आहे. यामुळे शहरात ठिकठिकाणी आतापासूनच गणेशमूर्तींचे स्टॉल्स लागले आहेत. यामध्ये प्रामुख्याने यंदा कापडी पितांबर, फेटा परिधान केलेले व विविध रत्नांद्वारे आकर्षक पद्धतीने सजविलेल्या विविधांगी रूपातील सुबक गणेशमूर्तींनी भक्तांना भुरळ घातल्याचे चित्र आहे.

गणेशोत्सव बघता येथील मूर्तीकारांकडे मोठ्या गणेशमूर्तींसह घरगुती लहान मूर्तीचे काम अंतिम टप्यात आले आहे. येथील मूर्तीकारांकडील गणेशमूर्ती ग्रामीण भागातील नागरिकही आपल्या घरी नेतात तर सार्वजनिक मंडळाच्याबहुतांश मूर्तीही शहरातच तयार केल्या जात आहेत.

गत तीन वर्षांपासून शहरात नेहमीच्याच मूर्तींना कापडी वस्त्र परिधान करून कृत्रिम रत्न जडवून आकर्षक पद्धतीने सजविलेल्या गणेशमूर्तींची चांगलीच 'क्रेझ' पाहायला मिळत आहे. प्रामुख्याने गणेशोत्सवात गणपतीची सजावट हा अत्यंत महत्त्वाचा भाग मानला जातो. परंतु, प्रत्येकालाच मूर्तीची सजावट शक्य नसल्याने विविध क्लृप्त्या वापरून आकर्षक पद्धतीने सजविलेल्या 'रेडिमेड' गणपतीला सध्या मोठी 'डिमांड' आली आहे. या पार्श्वभूमीवर शहरात विविध ठिकाणी अशा पद्धतीने सजविलेल्या गणेशमूर्तींचे स्टॉल्स लागले. मूर्तीकारांकडूनही नागरिक आपल्या पसंतीच्या मूर्तींचे बुकिंग करण्यासाठी गर्दी करत आहे.

**बाजारपेठ सजली...**

गौरी-गणपतीचा उत्सवाच्या अनुषंगाने गौरी-गणपतीच्या सजावटीच्या नानाविध साहित्यांनी सजली आहे. सजावटीसाठीची तोरणे, फुलांच्या माळा, जाळीचे पडदे, वॉलपीस, फुले, झुंबर, लायटिंग, मखर आदी साहित्य बाजारात सध्या उपलब्ध आहे.